परलोक
व त्याचे पुरावे

* लेखक *
सय्यद हामिद अली

* भाषांतर *
मुबारक हुसैन मुनयार

॥ अल्लाहच्या नावाने, जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे. ॥

लेखक परिचय

मौलाना सय्यद हामिद अली यांचा जन्म १ मे १९२३ रोजी कसबा मीरानपूर कटरा, जिल्हा शाहजहानपूर (उत्तर प्रदेश) येथे झाला. माध्यमिक शाळेतील शिक्षणानंतर फारसी व अरबी भाषेतील शिक्षण 'इशाअतुल उलूम' व 'मिसबाहुल उलूम' बरेलीत प्राप्त केले. शिक्षणाच्या अंतिम काळात 'इशाअतुल उलूम' मध्ये त्यांची शिक्षक म्हणून नेमणूक झाली. त्यानंतर इ. स. १९४४-४८ पर्यंत इस्लामिया कॉलेज शाहजहानपूरमध्ये ते अरबीचे शिक्षक म्हणून राहिले. नंतर शिक्षकी पेशाचा त्याग करून त्यांनी रामपूरहून 'जिन्दगी' नावाचे एक उर्दू मासिक सुरू केले, ज्याला दावत ट्रस्टने आपले नियतकालिक बनविले. ते दीर्घकाळपर्यंत त्या मासिकाचे संपादक म्हणून राहिले.

इ. सन १९४२ मध्ये 'जमाअत-ए-इस्लामी हिंद'चे सदस्य बनले. इ. सन १९४८ मध्ये 'जमाअत-ए-इस्लामी हिंद'च्या 'मजलिस-ए-शूरा' (सल्लागार समिती) चे सदस्य म्हणून त्यांची नेमणूक झाली. ते इ. सन १९७२ ते १९८१ पर्यंत 'जमाअत-ए-इस्लामी हिंद'चे चिटणीससुद्धा होते.

मौलाना सय्यद हामिद अली एक उच्चकोटीचे कुशल वक्ता होते. त्यांनी आपल्या भाषण व लेखाद्वारे इस्लामी चिंतनाचा मार्ग प्रशस्त केला. त्यांनी पन्नासपेक्षा अधिक पुस्तकांचे लेखन केले. इस्लामी विषयाव्यतिरिक्त अन्य धर्मांसंबंधीसुद्धा त्यांनी डझनभर उच्चकोटीची पुस्तके लिहिली, जी सर्वत्र लोकप्रिय ठरली. धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासाची मौलानांना विशेष आवड होती. या क्षेत्रात त्यांची काही प्रमुख पुस्तके अशी आहेत - बौद्ध धर्म व अनेकेश्वरत्व, जैन धर्म व ईश्वरभक्ती, हिंदू धर्म व एकेश्वरत्व, शीख धर्म व एकेश्वरत्व, एकेश्वरत्व व जुना करार (बायबल), येशू ख्रिस्त बायबल (नवीन करार) च्या आरशात, तौरातचे रत्न-कण वगैरे.

मौलाना केवळ ज्ञानाच्या क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक व सामुदायिक कार्यातसुद्धा अग्रेसर असत. 'मुस्लिम मजलिस-ए-मुशावरत' आणि 'मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड'तसुद्धा त्यांचे सक्रीय सहकार्य होते.

आपल्या जीवनाच्या अंतिम काळात ते पवित्र कुरआनची विश्वप्रसिद्ध अरबी तफ़सीर (समीक्षा) 'फ़ी ज़िलालिल़ कुरआन' लेखक सय्यद कुत्ब शहीद, च्या उर्दू भाषांतराचे काम करीत होते. काही भागांचे भाषांतर झाले होते की या दरम्यानच दिनांक ३ मार्च १९९३ ला दिल्लीत त्यांचे निधन झाले (ईश्वर त्यांना स्वर्गात स्थान देवो).

दोन शब्द

अल्लाहने आपली सर्वोत्तम निर्मिती मानवाला कर्म करण्याचे स्वातंत्र्य प्रदान केले आहे. या कर्मस्वातंत्र्याच्या आधारे मानव सत्कर्म व कुकर्म या दोहोंपैकी एकतर दोन्ही कर्म करू शकतो अथवा कोणतेही एखादे कर्म. तत्त्वदर्शी ईश्वराने या दोन्ही प्रकारच्या कर्मांचे वेगवेगळे फळ ठरविलेले आहे. माणसांना त्यांच्या कर्मांचा पुरेपूर मोबदला परलोकात प्राप्त होईल आणि निश्चितच प्राप्त होईल. सत्कर्म करणाऱ्यांना त्यांच्या कर्माच्या मोबदल्यात स्वर्गाची प्राप्ती होईल आणि कुकर्म करणाऱ्यांना नरकात घालण्यात येईल. स्वर्गच ते स्थान होय जेथे सत्कर्मी माणसांना परमानंदाची प्राप्ती होईल. तेथे ते सर्व काही असेल जे ते इच्छितील. एवढेच नव्हे तर त्यापेक्षासुद्धा अधिक काही असेल.

येथे हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की, इस्लाम परलोकपरायणतेच्या नावाने संसारत्याग व पलायनवादाचा धडा देत नाही, तर हा लौकिक व पारलौकिक जीवनाच्या सामंजस्याची शिकवण देतो. याच सामंजस्यामुळे मानवजीवन इहलोक व परलोकात मंगल बनू शकते आणि याच्या अभावात जीवन विनाशकारी बिघाडाला बळी पडते.

इस्लामच्या दृष्टीने हे इहलोक परीक्षास्थळ आहे आणि परलोक परिणामस्थळ आहे. याचे कारण असे की, परलोकातच पूर्ण मोबदल्याच्या प्राप्तीची शक्यता आहे. इहलोकात जो जितके चांगले कर्म करील, त्याला इहलोक व परलोकात तितकेच चांगले फळ प्राप्त होईल आणि जो या उलट कर्म करील त्याला त्याच्या कर्मानुसार दुष्परिणामांना तोंड द्यावे लागेल. परलोकपरायणता मानवाच्या हृदयात अल्लाहची भीती उत्पन्न करते आणि अल्लाहची भीती मानवाला कोणत्याही परिस्थितीत मानवी मूल्यांच्या रक्षणाची शिकवण देते. अल्लाहची भीती नसलेल्या मानवाच्या हृदयात दानवतेचा वास असतो. या अल्लाहच्या भयाचा अभाव अथवा परलोकविमुखतेचाच हा अपरिहार्य परिणाम होय की आज जवळजवळ सर्वत्र दानवी प्रवृत्तीचे लोक मानवी मूल्यांना अत्यंत क्रूरतेने आपल्या पायाखाली तुडवीत आहेत, म्हणून लोकांत परलोकपरायणतेची भावना उत्पन्न करण्याची किती आवश्यकता आहे हे सांगण्याची गरज नाही.

इस्लामसंबंधी विभिन्न विषयांवर विविध उत्कृष्ट कृतींची रचना करणारे प्रसिद्ध विद्वान आदरणीय दिवंगत मौलाना सय्यद हामिद अली यांच्या सुप्रसिद्ध 'जन्नत' नामक पुस्तकाच्या काही आरंभिक भागांचे मराठी भाषांतर 'परलोक व त्याचे पुरावे' या नावाने पुस्तकरूपात सादर करताना आम्हाला फार आनंद होत आहे. यात विद्वान लेखकाने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत पवित्र कुरआन व हदीसींच्या प्रकाशात परलोक आणि त्याच्या पुराव्याशी संबंधित विभिन्न तथ्यांचे प्रामाणिक, तार्किक, बौद्धिक, सटीक, चित्ताकर्षक, सारगर्भित, विस्तृत व विद्वत्तापूर्ण विश्लेषण प्रस्तुत केले आहे. या लहानशा पुस्तकात विद्वान लेखकाने लोकांमध्ये परलोकासंबंधी पसरलेले गैरसमज दूर करण्याचा सफल प्रयत्न केला आहे. याच्या अभ्यास व चिंतनाने जनसामान्यांत परलोकपरायणतेच्या भावनेचा उदय होईल. महान अल्लाहने या कार्याच्या मोबदल्यात दिवंगत मौलानांना 'शांतीचे गृह' प्रदान करावे. तथास्तु!

परलोकधारणेच्या पुष्टीसाठी पुरावे

परलोकाची धारणा इस्लामच्या तीन मौलिक धारणा एकेश्वरत्व, पैगंबरत्व व परलोक यापैकी एक महत्त्वपूर्ण धारणा आहे.

इस्लामची परलोकधारणा अल्लाहची विविध वैशिष्ट्ये व गुणांवर आधारित आहे. त्यापैकी काही अशी आहेत - * अल्लाह स्वामी व प्रभुतासंपन्न आहे. * अल्लाह कर्मांचे फळ देणारा आहे. * अल्लाह न्यायप्रिय आहे. * अल्लाह सर्वशक्तिमान आहे. * अल्लाह सर्व काही जाणणारा व सर्वांची खबर राखणारा आहे. * अल्लाह तत्त्वदर्शी व बुद्धिसंपन्न आहे. * अल्लाह कृपाळू व गुणग्राही आहे.

अल्लाह विश्व व मानवाचा स्रष्टा व पालनकर्ता आहे, म्हणून तोच विश्व व मानवाचा एकमात्र स्वामी व शासक आहे. हे एक न खोडता येणारे सत्य आहे. या सत्याचा स्वाभाविक परिणाम असा आहे की मनुष्य अल्लाहाचा दास व त्याची प्रजा आहे. त्याच्यासाठी योग्य आचरण हेच होय की त्याने अल्लाहचा दास व प्रजा बनून राहावे आणि निमूटपणे अल्लाहच्या आदेशांचे पालन करावे. याव्यतिरिक्त जे आचरण तो अवलंबील ते सत्याच्या विरुद्ध व घातक ठरेल.

"हे लोक हो! आपल्या पालनकर्त्यांचे दासत्व अंगीकारा. ज्याने तुम्हाला निर्माण केले आणि तुमच्या अगोदरच्या लोकांनासुद्धा आशा आहे की, अशा तऱ्हेने तुम्ही (अल्लाहच्या प्रकोपापासून) वाचू शकाल." (दिव्य कुरआन, २:२१)

सदर आयतीचा अंतिम अंश असा संकेत करतो की अल्लाह मालक व शासक असण्याचा स्वाभाविक परिणाम असा आहे की त्याने आज्ञाधारकांना बक्षीस व अवज्ञा करणाऱ्यांना शिक्षा करावी. पवित्र कुरआनचा 'सूरह फातिहा' हा पहिला सूरह होय. हा सूरह पवित्र कुरआनचा सार व आधार आहे. यात अल्लाहच्या वैशिष्ट्यांचे वर्णन अशा प्रकारे केले गेले आहे-

"सर्व प्रशंसा अल्लाहसाठीच आहे, जो संपूर्ण जगाचा पालन करणारा, पोषाण करणारा, स्वामी, शासक आहे. तो कृपाळू व दयावान आहे, त्या दिवसाचा मालक आहे ज्या दिवशी मोबदला दिला जाईल." (दिव्य कुरआन, १ :१-३)

'यौमिद्दीन' हे शब्द दर्शवितात की एक असा दिवस आला पाहिजे आणि तो दिवस येईल, जेव्हा माणसांना त्यांच्या कर्मांचे फळ मिळेल. त्या दिवशी हिशेब घेणे, निकाल देणे व निकाल लागू करण्याचे सर्व अधिकार अल्लाहच्या हातात असतील. त्या दिवशी आज्ञाधारकांना स्वर्ग प्राप्त होईल आणि अवज्ञा करणाऱ्यांना नरकाच्या भयंकर प्रकोपात टाकले जाईल.

"निःसंदेह पुण्यशील लोक (स्वर्गाच्या) देणग्यात असतील आणि दुराचारी धगधगत्या अग्नीत, ज्यात ते प्रवेश करतील. मोबदला दिला जाणाऱ्या दिवशी आणि त्यातून ते निघू

शकणार नाहीत आणि तुम्हाला काय कल्पना की, काय आहे मोबदला दिला जाण्याचा दिवस! पुन्हा (सांगतो), तुम्हाला काय माहीत की, काय आहे मोबदला दिला जाण्याचा दिवस! ज्या दिवशी कोणताही प्राणी कोणत्याही प्राण्यासाठी काहीही करू शकणार नाही आणि त्या दिवशी संपूर्ण अधिकार आणि सत्ता अल्लाहच्या हातात असेल.''

(पवित्र कुरआन, ८२ : १३-१९)

मोबदला दिला जाण्याचा दिवस, जसा की पवित्र कुरआनच्या आयतीं (वचने) वरून स्पष्ट होते- वर्तमान जीवनात व वर्तमान जगात नव्हे तर, या जगानंतर अस्तित्त्वात येणाऱ्या एका 'शाश्वत लोक' व या जीवनानंतर प्राप्त होणाऱ्या एका शाश्वत जीवन 'परलोक'मध्ये असेल. जीवन व मृत्यूचे हे संमेलन ज्याचे नाव जग असे आहे, ते मोबदला प्राप्त करण्याचे स्थळ नव्हे, तर ते कर्मस्थळ व परीक्षास्थळ आहे. म्हणून बक्षीस व शिक्षेसाठी एक अन्य लोक व एक दुसरे जीवन आवश्यक आहे.

''ज्याने मृत्यू व जीवनाची निर्मिती केली जेणेकरून तुमची परीक्षा घ्यावी की, तुमच्यापैकी कोण चांगल्यात चांगले कर्म करणारा आहे.'' (पवित्र कुरआन, ६७ : २)

''प्रत्येक प्राण्यास मृत्यूची चव घ्यावयाची आहे आणि तुम्हाला तुमचा भरपूर मोबदला प्रलयकाळाच्या दिवशी दिला जाईल. तर (त्या दिवशी) ज्याला नरकापासून वाचविले गेले आणि स्वर्गात दाखल केले गेले तो निःसंदेह यशस्वी झाला.''(पवित्र कुरआन, ३ : १८५)

हे पवित्र कुरआनचेच कथन नव्हे तर आमचासुद्धा अनुभव आहे की, या जगात चांगल्या माणसांना त्यांच्या चांगल्या कर्मांचा व वाईट लोकांना त्यांच्या वाईट कृत्यांचा पुरेपूर मोबदला मिळत नाही. इतकेच नव्हे तर निश्चितपणे असेही घडते की, चांगल्या लोकांना सत्कार्याचा अपराध म्हणून हालअपेष्टा व त्रासाला तोंड द्यावे लागते, त्यांना तुरुंगाच्या लोखंडी गजाआड डांबले जाते. त्यांना हृदयद्रावक अत्याचार व यातना भोगाव्या लागतात आणि अखेरीस फाशीपर्यंत मजल जाते. या उलट अनेक अत्याचारी, पापी व दुराचारी आयुष्यभर मौज-मजा लुटत राहतात. चंगेजखान, हलाकू तैमूरलंग, हिटलर व स्टॅलिनने लक्षावधी व कोट्यवधी लोकांवर जुलूम व अत्याचार केले; परंतु त्यांना जगात कुठे शिक्षा मिळाली? ते तर आयुष्यभर भोग-विलास व सत्तेचा आनंद लुटत राहिले. या स्थितीचे काय औचित्य आहे?

असे आहे काय की, न्याय, चांगुलपणा, नैतिकता व मानवता चूक आहे आणि अत्याचार, दुराचार, राक्षसी वृत्ती व रानटीपणा बरोबर आहे? बुद्धी व विवेक असणारी कोणतीही व्यक्ती याचे उत्तर होकारार्थी देऊ शकणार नाही. मग याचे कारण असे आहे काय की, जग अंधेर नगरी आहे आणि येथील राजा- अल्लाह- चौपट राजा आहे आणि येथे चांगुलपणाचा वाईट व वाईटपणाचा चांगला मोबदला मिळतो? जर हे स्पष्टीकरणसुद्धा बुद्धी व चेतना जिवंत असता मान्य करणे शक्य नाही, तर मग हीच गोष्ट सत्य आहे की, हे जग कर्माचे फळ मिळण्याची जागा नव्हे, तर हे कर्म करण्याचे स्थळ होय. येथे प्रत्येक

व्यक्तीची परीक्षा घेतली जात आहे आणि संकट, अडचणी व भोगविलास वगैरे परीक्षेचे विभिन्न प्रश्नपत्र आहेत. जगातील हे जीवन, कर्म करण्यासाठी मिळालेली सवड आहे. त्यानंतर प्रत्येक व्यक्तीला अल्लाहसमोर हजर होणे व आपल्या सर्व कर्मांची उत्तरे द्यावयाची आहेत.

"प्रत्येक प्राण्याला मृत्यूची चव घ्यावयाची आहे आणि आम्ही तुम्हाला दुःख व सुख या दोन्ही प्रकारच्या परीक्षा घेऊन अजमावितो आणि तुम्ही सर्वजण (कर्मांचे फळ प्राप्त करण्यासाठी) आमच्याकडे परतविले जाल." (दिव्य कुरआन, २१ : ३५)

"त्या दिवशी लोक (अल्लाहसमोर) परतून विभिन्न टोळ्यांच्या रूपाने येतील, जेणेकरून त्यांना त्यांचे कर्मपत्र दाखविले जावेत. मग ज्याने कणभरसुद्धा सत्कृत्य केले असेल ते तो पाहील आणि ज्याने कणभरसुद्धा दुष्कृत्य केले असेल तेही तो पाहील."

(दिव्य कुरआन, ९९ : ६ - ८)

येथे कोणाला दुःख, उपासमार, आजार आणि प्राण व संपत्तीला धोका वगैरेने अजमाविले जात आहे आणि कोणाची सुख-चैन व भोग-विलासाद्वारे, स्वास्थ्य व शक्ती, धन-संपत्ती व सत्तेद्वारे परीक्षा घेतली जात आहे. मग कर्मस्थळ व परीक्षास्थळ असण्याचा हा स्वाभाविक परिणाम आहे की येथे चांगुलपणा व वाईटपणा, दोन्ही मार्गांवर माणसाला अग्रेसर होण्याची निर्विघ्न संधी, दोघांची कारणे व प्रवृत्ती पूर्णपणे उपलब्ध आहेत आणि माणसाला पूर्ण स्वतंत्र्य आहे की, त्याने आपल्या इच्छेप्रमाणे आपला मार्ग स्वीकारावा आणि त्यानुसारच परलोकात बक्षीस अथवा शिक्षा प्राप्त करावी.

"आणि (हे प्रेषित!) सांगा, हे सत्य आहे तुमच्या पालनकर्त्याकडून तर ज्याची इच्छा असेल त्याने श्रद्धा बाळगावी व ज्याला हवे त्याने इन्कार करावा. निश्शितच आम्ही अत्याचारी लोकांसाठी एक अग्नी तयार ठेवला आहे, जो तंबू बनून त्यांना चोहीकडून घेरील. जर ते (तहानेने) पाणी मागतील तर त्यांना असले पाणी दिले जाईल, जे वितळलेल्या तांब्यासारखे असेल आणि जे तोंडाला भाजून टाकील. फारच वाईट आहे ते पेय पदार्थ व फारच वाईट आहे ते स्थान. (याउलट) ज्या लोकांनी श्रद्धा बाळगली आणि योग्य कर्म केले (त्यांना आम्ही निश्चितच पूर्ण चांगले फळ देऊ) निःसंदेह आम्ही अनुकूल कर्म करणाऱ्याचे फळ व्यर्थ जाऊ देत नाही." (दिव्य कुरआन, १८ : २९-३०)

इतकेच नव्हे की या जगात चांगल्या लोकांना त्यांच्या चांगुलपणाचा व वाईट लोकांना त्यांचा वाईटपणाचा यथार्त मोबदला मिळत नाही तर, या जगात ज्याची साधने सीमित आहेत व या जीवनात ज्यांची अवधी फार थोडी आहे, अशा स्थितीत कोणत्याही व्यक्तीला चांगुलपणा अथवा वाईटपणाचा पूर्ण मोबदला अर्थात बक्षीस अथवा शिक्षा दिली जाऊ शकत नाही. एका अशा माणसाची कल्पना करा, ज्याच्या सच्चरित्रता व सत्याच्या आवाहनाने प्रभावित होऊन सहस्रावधी व लक्षावधी लोक सरळ व खऱ्या मार्गावर चालू लागले आणि ज्यांच्या शिकवणी व ज्याचे प्रशिक्षण प्राप्त केलेल्या लोकांकडून प्रभावित

होऊन प्रलयकाळापर्यंत अगणित लोक सच्चरित्र बनत राहतील, अशा माणसाला त्याच्या सीमित जीवनात आपण काय मोबदला देऊ शकाल? मोठ्यात मोठा मोबदलासुद्धा ज्याची केवळ कल्पनाच आपण करू शकाल, त्याच्या सच्चरित्रता व प्रयत्नांच्या तुलनेत अत्यंत तुच्छ असेल. हीच स्थिती शिक्षेची आहे. हिटलरने लक्षावधी लोकांची हत्या करविली. त्याच्या आदेशाने अगणित लोकांवर भयंकर अत्याचार केले गेले आणि त्याच्या युद्धविषयक हालचालींच्या फलस्वरूप कोट्यवधी व अब्जावधी लोक राजनीतिक व आर्थिक दुर्दशेला बळी पडले. जर हा महान अपराधी जिवंतपणे आपल्या हाती आला असता तर, आपण त्याला काय शिक्षा दिली असतो? जी कोणती शिक्षा आपण त्याला दिली असती, ती त्याच्या अपराधांच्या तुलनेत अत्यंत तुच्छ ठरली असती. ही तर झाली मोठ्या अपराध्यांची गोष्ट लहान अपराधीसुद्धा आपल्या जीवनात इतके खून करतात, त्यांनी इतकी अब्रू लुटलेली असते आणि इतक्या कुटुंबांना नष्ट भ्रष्ट केलेले असते की, त्यांच्या लहानशा जीवनात कोणत्याही प्रकारे त्यांच्या अपराधांची शिक्षा दिली जाऊ शकत नाही. वास्तविकता तर अशी आहे की बक्षीस व शिक्षा दोहोंसाठी असीम काळ व विपुल साधनांची आवश्यकता आहे, जे या जगात मिळणे अशक्य आहे. होय, परलोकाची अवधी निस्सीम आहे आणि त्याची बक्षिसे व यातनासुद्धा व्यापक आहेत आणि तेथे बक्षिसे व शिक्षा प्राप्त करण्यासाठी माणसाला सदासर्वदा टिकणारे जीवन प्राप्त होईल.

आणखी एका दृष्टिकोनाने विचार करा. कोणत्याही माणसाला त्याच्या सच्चरित्राच्या मोबदल्यात जी काही उत्तम गोष्ट मिळू शकते, ती आपल्या समवेत जबाबदारी व उत्तरदायित्वाचा दुहेरी भार आणतो. धनसंपत्ती व सत्तेलाच घ्या. या गोष्टीना तेव्हाच मोबदला अथवा बक्षीस म्हणून नाव दिले जाईल. जेव्हा त्यांच्या बरोबर येणाऱ्या जबाबदारीचा फार मोठा भार व कष्टप्रद उत्तरदायित्वाची कल्पना नसावी. वास्तविकता अशी आहे की एका अल्लाहभक्त व चारित्र्यवान व्यक्तीसाठी राजसिंहासन फुलांची गादी नसून काट्यांनी भरलेले अंथरुण होय. सत्ता प्राप्त केल्यानंतर त्या व्यक्तीला दिवसातील विश्राम व रात्रीच्या झोपेला मुकावे लागते. तो मनुष्य आनंदित व गौरवान्वित होण्याऐवजी अत्यंत व्याकुळ व या चिंतेने भरलेले जीवन जगतो की, तो कशाप्रकारे ती महान परीक्षा देऊन यशस्वी होईल आणि अल्लाहच्या न्यायालयात लक्षावधी व कोट्यवधी लोकांचे अधिकार पूर्ण करण्याचा जाब देईल. होय, कसोटी जबाबदारी व उत्तरदायित्वाच्या कल्पनेपासून जर माणसाचे मस्तक रिक्त झाले तर त्याच्यासाठी सत्ता व आसन बक्षीस बनू शकते. परंतु या परिस्थितीत सत्ताधारी मनुष्य आपली मानवता व आपले चरित्र नष्ट करील आणि अगणित लोकांवर अत्याचारांचे डोंगर कोसळवील व त्यांचे जीवन नष्ट करण्यास कारणीभूत ठरेल. किती अजब आहे हा पुरस्कार! किती भयंकर आहे हा मोबदला! खरे तर असे आहे की मोबदल्यासाठी असले जग हवे जेथे देणग्या तर असाव्यात; परंतु त्याचबरोबर जबाबदारी व उत्तरदायित्व असू नये आणि असे असूनदेखील मनुष्याने सच्चरित्रतेपासून परत होऊ नये व त्याने जगवासियांच्या दृष्टीने धिक्कारणीय बनू नये. अशाच जगाचे नाव

'परलोक' आहे.

आणखी एका पैलूने विचार करा. या जगात माणसाला ज्या देणग्या प्राप्त होतात अथवा प्राप्त होऊ शकतात, त्यांच्या समवेत भय व शोक या दोन मर्मांतक गोष्टी त्याचा पाठलाग केल्याशिवाय सोडीत नाहीत. देणगी जितकी मोठी असेल तितकीच मोठी भीती, ती हिसकावून घेतली जाण्याची असेल आणि तितकाच शोक ती हातातून गेल्यास होईल. तसे पाहिले तर भय व शोक सांसारिक जीवनाचे दोन आधारभूत पैलू आहेत व कोणताही मनुष्य मग तो कितीही मोठा का असेना यांच्यापासून पिच्छा सोडवू शकत नाही. ते पवित्र आत्मा ज्यांच्या हृदयात केवळ अल्लाहशिवाय इतर कोणाचेही भय असत नाही आणि ज्यांची मने सांसारिक भोगविलासात गुंतलेली नसतात तेसुद्धा भय व शोकापासून पूर्णपणे मुक्त असत नाहीत, संकट व अडचणींनी तेसुद्धा प्रभावित झालेले दिसतात आणि शोक व चिंतेच्या प्रसंगी त्यांच्या डोळ्यांतूनसुद्धा अश्रू गळतात. मग जगाच्या शोक व भयाने त्यांचे मन हलके होते आणि अल्लाहचे भय व परलोकचिंता यासारख्या भयंकर गोष्टीने त्यांचे काळीज फाटते व हृदय शोकाकुल राहते.

भय व शोक धैर्यपरीक्षेच्या या दोन्ही बाबी देणग्या प्राप्त झाल्यामुळे आणि त्या वाढल्यामुळे वाढतात. हेच कारण आहे की मनुष्य जगात कधीच निश्चित होऊन आत्मसंतोषाने या देणग्यांचा लाभ घेऊ शकत नाही. हेच कारण आहे की गरीब व निर्बळ आणि सत्ताहीन लोक ज्या शांती व निश्चिंततेने आपले जीवन जगतात, धनधान्याने संपन्न व सत्ताधारी लोक त्याला पारखे झालेले असतात. प्रत्येक क्षणी त्यांना आपले प्राण, संपत्ती, प्रतिष्ठा व सत्ता हरण होण्याची भीती लागलेली असते. जनसामान्यांच्या तुलनेत त्यांचे शत्रू अधिक व त्यांची संकटे फार भयंकर असतात. संरक्षणाची उत्तम व्यवस्था असूनदेखील संकटे त्यांच्या चोहीकडे धिरट्या घालीत असतात. ते अत्यंत भयाक्रांत जीवन व्यतीत करतात. या जगात एखाद्याला देणग्यांच्या रूपाने पुरस्कार देण्याचा अर्थ आहे की त्याला संकटात ढकलून दिले जावे. हे बक्षीस आहे की शिक्षा? वास्तविकता अशी आहे की बक्षीसासाठी एका असल्या जगाची गरज आहे, जेथे भय व शोकाला प्रवेश नसावा आणि ते जग परलोक आहे. त्या मृत्यूचीही भीती नाही व देणग्या हिसकावून घेतल्या जाण्याचीही भीती नाही. तेथे कोणत्याही प्रकारचे दुःख नाही.

"होय, जे लोक स्वतःला अल्लाहच्या हवाली करतील व ते सत्यनिष्ठ आणि विनयशील असतील तर त्यांचा मोबदला त्यांच्या अल्लाहजवळ (परलोकात) आहे आणि त्यांना कोणत्याही प्रकारची भीती व दुःख असणार नाही." (दिव्य कुरआन, २ : ११२)

अल्लाहचा एक महत्त्वपूर्ण व मौलिक गुण असा आहे की, तो न्यायप्रिय आहे व अत्याचाराच्या कोणत्याही साधारण गुणाच्या लेशमात्रपासूनसुद्धा तो पूर्णपणे मुक्त आहे. अत्याचार कोठे का असेना अत्यंत तिरस्कारणीय आहे. अल्लाह प्रत्येक दोष व उणिवांपासून पवित्र आहे आणि सर्व श्रेष्ठतम सद्‌गुणांचा स्रोत आहे. त्याच्या संबंधाने अशी कशी कल्पना केली जाऊ शकते की अत्याचारासारखा अत्यंत घृणित दुर्गुण त्याच्यात असू शकेल? नव्हे,

तो तर न्याय व करुणेचे भांडार आहे आणि अत्याचार व जुलमाचा त्याच्याशी काडीमात्रसुद्धा संबंध नाही. पवित्र कुरआनमध्ये अल्लाहच्या या गुणाचा पुन्हा पुन्हा उल्लेख आला आहे -

''अल्लाहने देवदूतांना आणि ज्ञानी लोकांना ग्वाही दिली की अल्लाहशिवाय इतर कोणीही पूजनीय नाही. कारण तो न्यायप्रिय आहे.'' (दिव्य कुरआन, ३ : १८)

तो अत्याचारी नाही आणि दासांवर कधीही अत्याचार करीत नाही -

''आणि अल्लाहची जगवासियांवर अत्याचार करण्याची इच्छा नाही.''

(दिव्य कुरआन, ३ : १०८)

''अल्लाह आपल्या सेवकांवर अत्याचार करू इच्छित नाही.''

(दिव्य कुरआन, ४० : ३१)

तो कोणत्याही जातीवर अत्याचार करून तिचा नायनाट करीत नाही. तो तिला त्या वेळी नष्ट करतो, जेव्हा ती जात दुराचारात नखशिखांत बुडालेली असते आणि ती पृथ्वीवर बिघाड उत्पन्न करू लागते.

''तुमच्या पूर्वींच्या (नष्ट झालेल्या) जातीत, त्या थोड्या लोकांना (सोडून) की ज्यांना आम्ही वाचविले, असले सद्गुणी लोक का निर्माण झाले नाहीत जे लोकांना पृथ्वीवर बिघाड पसरविण्यापासून रोखू शकले असते? अत्याचारी लोक त्या सुख-सामुग्रीच्या पाठीमागे लागले आणि हेच लोक अपराधी व निधर्मी होते आणि हे शक्य नाही की तुझ्या पालनकर्त्याने विनाकारण वस्त्या नष्ट कराव्यात की जेव्हा तेथील लोक सुकर्म करणारे व सज्जन असावेत.'' (दिव्य कुरआन, ११ : ११६-११७)

अल्लाहला अत्याचार पसंत नाही आणि तो अत्याचारी लोकांचा शत्रू आहे.

''अल्लाह अत्याचाऱ्यांना पसंत करीत नाही.'' (दिव्य कुरआन, ३ : ५७)

त्याने मानवांना न्याय करण्याचा आदेश दिला आहे -

''सांगा, माझ्या प्रभुने न्यायाचा आदेश दिला आहे.'' (दिव्य कुरआन, ७ : २९)

त्याने ग्रंथ व प्रेषितांना अशासाठी पाठविले आहे की, जेणेकरून मानवसमाजात न्यायाची स्थापना व्हावी.

''निश्चितपणे आम्ही आमच्या प्रेषितांना स्पष्ट पुराव्यासह पाठविले आणि त्यांच्या बरोबर ग्रंथ व तुळा उतरविली जेणेकरून लोकांनी न्यायाधिष्ठित व्हावे.''

(दिव्य कुरआन, ५७ : २५)

तो त्याला मानणाऱ्या लोकांना आदेश देतो की, त्यांना जगात सत्याची ग्वाही देणारे व न्यायाची स्थापना करणारे बनावे, मग त्यांना आणि त्यांच्या नातेवाईकांना हानी का सहन करावी लागू नये.

''हे श्रद्धावंतांनो! न्यायाची स्थापना करणारे व अल्लाहसाठी (न्यायाची) ग्वाही देणारे

बना, मग ही गोष्ट स्वत: (तुमच्या) आणि तुमच्या आई-वडिलांच्या व नातेवाईकांच्या विरूद्ध का असेना.''
(दिव्य कुरआन, ४ : १३५)

एखादी जात श्रद्धावंतांची कितीही मोठी शत्रू का असेना आणि त्यांना तिच्याशी कितीही शत्रुत्व का असेना, श्रद्धावंतांनी तिच्याशी व्यवहार करताना न्याय व सत्याची कास सोडता कामा नये.

''हे श्रद्धावंतांनो! अल्लाहसाठी उभे ठाकणारे व न्यायाची ग्वाही देणारे बना आणि एखाद्या जातीच्या अथवा टोळीच्या शत्रुत्वाने तुम्हाला यासाठी उत्तेजित करू नये की तुम्ही न्याय करू नये. (प्रत्येक स्थितीत) न्याय करा, हेच धर्मपरायणतेच्या जवळ आहे आणि अल्लाहचे भय बाळगा. नि:संदेह जे काही तुम्ही करता अल्लाहला त्याची खबर असते.''
(दिव्य कुरआन, ५ : ८)

असा आहे अल्लाह! महानतम न्यायकर्ता! अत्याचाराचा तिरस्कार करणारा आणि न्याय व सत्याची आज्ञा देणारा! मग असला स्वामी व शासक स्वत: न्याय करणार नाही काय? तो दुराचारी लोकांना शिक्षा करणार नाही? जे लोक त्याच्या राज्यात दुराचार व दानवी वृत्तीचे वादळ उठवितात आणि त्याच्या दृष्टीसमोर त्याने दिलेल्या अधिकारांचा दुरुपयोग करून त्याच्या निर्बळ व निष्पाप लोकांवर जुलूम व अत्याचार करतात. मग त्यांना दुष्कृत्यांचा मोबदला देणार नाही काय? पीडितांची फिर्याद कधीही ऐकली जाणार नाही काय? सज्जन व आज्ञाधारक दासांना त्यांच्या सत्कर्म व ईशभक्तीचे फळ कधीही मिळणार नाही काय? जे लोक अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी रात्रंदिवस अडचणींना तोंड देतात आणि त्याच्या मार्गात सर्व प्रकारचा त्याग करतात, त्यांना त्यांच्या त्यागाचा काहीही मोबदला मिळणार नाही काय? असे घडणे शक्य नाही. अल्लाहच्या न्यायप्रिय असण्याचा अनिवार्य परिणाम असा आहे की, अत्याचरी व दुश्चरित्र लोकांना शिक्षा व आज्ञाकारी आणि सज्जनांना पुरस्कार मिळावा. परंतु या जगात असे घडत नाही. या जगात असे घडणे शक्य नाही म्हणून हे आवश्यक आहे की, आणखी एका जगाची अथवा लोकाची निर्मिती व्हावी, माणसाने दुसऱ्यांदा जीवित व्हावे, अल्लाहचे न्यायालय अस्तित्त्वात यावे, लोकांच्या जीवनातील कर्मांचा संपूर्ण हिशेब सादर केला जावा आणि मग प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्माप्रमाणे शिक्षा अथवा पुरस्कार प्राप्त करावा.

''तर जी व्यक्ती श्रद्धावंत आहे. ती त्या व्यक्तीप्रमाणे असू शकते काय? जी अवज्ञाकारी आहे? (नाही) या दोन्ही समान असू शकत नाहीत! ज्या लोकांनी श्रद्धा बाळगली आणि सत्कर्म केले, त्यांच्यासाठी स्वर्गाचे स्थान आहे, ही त्यांच्या पाहुणचाराची सामुग्री आहे, त्या कृत्यांच्या मोबदल्यात, जी ते करीत असत. उरले ते लोक जे अवज्ञाकारी आहेत. तर त्यांचे स्थान अग्नी (नरक) आहे. जेव्हा जेव्हा ते त्यातून बाहेर निघण्याचा प्रयत्न करतील, पुन्हा त्याच्यातच ढकलून दिले जातील.''
(दिव्य कुरआन, ३२ : १८-२०)

''त्याच्याकडे तुम्हा सर्वांना परतून जावयाचे आहे. हे अल्लाहचे खरे वचन आहे.

नि:संदेह तो पहिल्यांदा निर्माण करतो व मग तोच दुसऱ्यांदा निर्माण करील. जेणेकरून त्याने त्या लोकांना, ज्यांनी श्रद्धा बाळगली व सत्कर्म केले न्यायपूर्वक मोबदला द्यावा आणि जे लोक अवज्ञाकारी आहेत. त्यांच्यासाठी उकळत असलेले पिण्याचे पाणी व भयंकर यातना आहेत, त्या इन्कारासाठी जो ते करीत होते.'' (दिव्य कुरआन, १० :४)

''आणि आम्ही प्रलयकाळाच्या दिवशी तराजू लावू त्यामुळे कोणावर कसलाही अत्याचार होऊ शकणार नाही. जर तिळमात्रसुद्धा एखादे कर्म असेल तर ते आम्ही आणून हजर करू आणि हिशेब करण्यासाठी आम्ही पुरेसे आहोत.'' (दिव्य कुरआन, २१ : ४७)

''आणि 'सूर' (अंतिम निवाड्याच्या दिवशी आदरणीय (इस्राफील) मृतांना जागे करण्यासाठी फुंकतील ती तुतारी) फुंकला जाईल तेव्हा जे लोक आकाशात आहेत आणि जे पृथ्वीवर आहेत, सर्वजण बेशुद्ध होतील, त्यांच्याशिवाय की ज्यांना अल्लाहने इच्छिले (की ते बेशुद्ध होऊ नयेत). मग पुन्हा 'सूर' फुंकला जाईल; तर पाहा लोक उभे राहतील आणि पाहत असतील व पृथ्वी आपल्या पालनकर्त्याच्या तेजाने दैदिप्यमान होईल आणि कर्मपत्र ठेवले जातील. प्रेषितांना व साक्षीदारांना आणले जाईल आणि लोकांच्या दरम्यान अगदी बरोबर निर्णय दिला जाईल; त्यांच्यावर कसलाही जुलूम होणार नाही. प्रत्येक व्यक्तीला जे काही दिले गेले होते, त्यांचा पुरेपूर मोबदला दिला जाईल आणि अल्लाह ते कर्म चांगल्याप्रकारे जाणतो, जे काही ते करतात.''

न्यायप्रिय असून जर एखादा शासक आपल्या साम्राज्यातील बंडखोर अत्याचारी व दुष्टांना शिक्षा व आज्ञाधारकांना आणि निष्कपट लोकांना पुरस्कार देत नसेल तर, त्याचे कारण एक तर असे असते की, तो असहाय व अशक्त असतो किंवा त्याला वेळीच परिस्थितीचे योग्य आकलन होत नाही. मनुष्य असल्यामुळे पृथ्वीतलावरील शासकांत या दोन्ही उणिवा आढळू शकतात आणि कोणत्या न कोणत्या सीमेपर्यंत आढळतातसुद्धा. कधी त्यांना खऱ्या परिस्थितींचे ज्ञान नसते आणि कधी कधी ज्ञान असूनदेखील त्यांना स्वत: असहाय व लाचार असल्याचा अनुभव येतो. त्या अल्लाहसंबंधी, जो सर्व प्रकारच्या उणिवा व दुर्गुणांपासून पूर्णपणे मुक्त आहे, अशा तऱ्हेची कल्पना केली जाऊ शकते काय? तो इतका लाचार व निर्बल आहे की, आपल्या दासांना पुरस्कार अथवा शिक्षा देऊ शकत नाही अथवा पुरस्कार व शिक्षा देण्यासाठी मनुष्याला पुन्हा जिवंत करण्याचे व एका नवीन लोकाची (जगाची) निर्मिती करण्याचे त्यात सामर्थ्य नाही काय? की त्याला या गोष्टीची कल्पना नाही की, त्याने निर्माण केलेला माणूस त्याने दिलेल्या अधिकारांचा कसा प्रयोग करीत आहे? पृथ्वीवर सत्य-असत्य प्रकाश व अंधकार, चांगुलपणा व वाईटपणा यांच्या दरम्यान सुरु असलेल्या संघर्षाची त्याला कल्पना नाही का? आणि या संघर्षात सत्यनिष्ठ लोक दुष्ट लोकांकडून दिल्या जाणाऱ्या यातना सहन करीत आहेत, याची त्याला जाणीव नाही का? त्याच्या दृष्टीत ही गोष्ट नाही का की, अत्याचार व अन्याय करणाऱ्या लोकांनी पृथ्वीला भांडण व उपद्रव, अत्याचार व बिघाडाने भरून टाकले आहे आणि त्याच्या निर्बळ व असहाय दासांना जिवंत राहणे कठीण झाले आहे? नाही, यांपैकी कोणतीही गोष्ट

खरी नाही. अल्लाह निर्बल नाही, तो सर्वशक्तिमान आहे; तो हवे तेव्हा आपल्या सृष्टी (मनुष्य) ला पकडू शकतो व त्याला शिक्षा देऊ शकतो. तो मनुष्याला पुन्हा निर्माण करू शकतो. तो या ब्रह्मांडासारखे आणि यापेक्षा अधिक चांगले अगणित ब्रह्मांड निर्माण करू शकतो; त्याशिवाय तो अज्ञानी व बेखबरसुद्धा नाही. अल्लाह अज्ञानी व बेखबर असत नाही. कण कण त्याच्या नजरेत असते; माणसाची वाचा व कृतीच नव्हे तर, त्याच्या मनीषा व हेतुसुद्धा त्याला माहीत असतात आणि तो मनुष्यापेक्षा अधिक त्यांच्याशी परिचित आहे. मग हे कसे शक्य आहे की त्याने पुरस्कार अथवा शिक्षा देऊ नये? जर हे जग पुरस्कार आणि शिक्षेसाठी पुरेसे नसेल व त्याचे क्षेत्र मर्यादित असेल तर तो आणखी एका जगाची (लोक) निर्मिती करील; मनुष्यांना दुसऱ्यांदा जीवन प्रदान करील आणि लोकांचा त्यांच्या कर्मपत्रावरून की जे प्रत्येक क्षणी लिहिले जात आहेत आणि पृथ्वी, मानवाच्या अंगप्रत्यंगाची साक्ष व आपल्या ज्ञानाच्या प्रकाशात, बरोबर हिशेब घेईल आणि त्यांना न्यायसंगत विधिने पुरस्कार अथवा दंड देईल; हीच त्याच्या सर्वशक्तिमान व सर्वज्ञ असण्याची निकड आहे आणि ईशवाणी पवित्र कुरआन या गोष्टीची पुष्टी करतो की, असेच घडेल -

"त्यांनी या गोष्टीकडे लक्ष दिले नाही काय की अल्लाह ज्याने आकाशांना व पृथ्वीला निर्माण केले आणि त्यांना निर्माण करण्याने थकला नाही. या गोष्टीचे सामर्थ्य अवश्य राखतो की, त्याने मृतांना जिवंत करावे? का नाही! त्याला प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य प्राप्त आहे."

(दिव्य कुरआन, ४६ : ३३)

"हे लोक (अवज्ञाकारी) पृथ्वीवर अल्लाहाला विवश करू शकणार नाहीत (की त्याने त्यांना शिक्षा देऊ न शकावे) आणि तुम्ही कदापि असे समजू नये अल्लाह अत्याचारी लोकांच्या अत्याचारापासून अनभिज्ञ आहे (म्हणून तो त्यांना शिक्षा करीत नाही.) त्याने (त्यांच्या बाबी) केवळ अशा दिवसासाठी स्थगित ठेवल्या आहेत की जेव्हा डोळे (भयाने) फाटलेले राहतील."

(दिव्य कुरआन, १४ : ४२)

"तुम्ही कदापि असे समजू नये की अल्लाहने आपल्या प्रेषितांना जे वचन दिले आहे (की अवज्ञा करणाऱ्यांना तो शिक्षा देईल) ते पूर्ण करणार नाही. नि:संदेह अल्लाह अपार शक्तीचा स्वामी व मोबदला देणारा आहे. हे त्या दिवशी घडेल की जेव्हा ही पृथ्वी परिवर्तित करून दुसरी पृथ्वी निर्माण केली जाईल आणि आकाश दुसऱ्या आकाश (मध्ये बदलले जातील) आणि सर्वजण अल्लाहसमोर उपस्थित होतील. जो एकटाच (शासक) व प्रभुत्वशाली आहे आणि त्या दिवशी तुम्ही अपराध्यांना साखळ्यांनी बांधलेले पाहाल; त्यांचे कपडे डांबराचे असतील आणि अग्नी (च्या ज्वाला) त्यांच्या चेहऱ्यावर पसरत असतील; असे अशासाठी घडेल की जेणेकरून अल्लाहने सर्व प्राण्यांना त्यांच्या कमाईचा मोबदला द्यावा; नि:संदेह अल्लाह शीघ्र हिशेब घेणारा आहे. त्याला हिशेब करण्यास उशीर लागत नाही."

य(दिव्य कुरआन, १४ : ४७-५१)

"आणि अल्लाहचेच आहे जे काही आकाशात आहे आणि जे काही पृथ्वीवर आहे,

जेणेकरून ज्या लोकांनी अपकृत्य केले त्यांना त्यांच्या कृत्याचा मोबदला द्यावा आणि ज्या लोकांनी सत्कृत्य केले त्यांना चांगला मोबदला प्रदान करावा. ते लोक जे मोठमोठाले पाप व अश्लील गोष्टीपासून अलिप्त राहतात. ही गोष्ट वेगळी की, संयोगवश एखादे साधारण पाप घडावे. नि:संदेह तुमचा पालनकर्ता अत्यंत क्षमाशील आहे. तो तुम्हाला चांगल्या प्रकारे जाणतो. (त्या वेळेपासून) की जेव्हा त्याने तुम्हाला पृथ्वी (माती) पासून निर्माण केले आणि जेव्हा तुम्ही भ्रूण अवस्थेत आपापल्या आईंच्या पोटात होता. म्हणून तुम्ही स्वत:ला पवित्र आत्मा ठरवू नका. तो चांगल्या प्रकारे जाणतो की कोण भय बाळगणारा आहे.''

(दिव्य कुरआन, ५३ : ३१-३२)

तात्पर्य असे की तो स्वामी व शासक आहे, सर्वशक्तिमान आहे आणि संपूर्ण ब्रह्मांडाची सत्ता त्याच्याच हातात आहे. तो अवज्ञा व आज्ञापालन करणाऱ्या दोघांच्यासुद्धा हालचालीशी परिचित आहे. म्हणून तो अवज्ञा करणाऱ्यांना त्यांच्या अवज्ञेकरिता शिक्षा देईल व आज्ञापालन करणाऱ्यांना त्यांच्या आज्ञापालनासाठी पुरस्कार देईल.

अत्याचाराप्रमाणेच मूर्खपणासुद्धा फार मोठा दोष आहे. एवढेच नव्हे तर खरोखर तो सर्व अपराध व दोषांचा स्रोत आहे. मूर्ख माणसाकडून कोणत्याही प्रकारची त्रुटी किंवा अपराध घडणे संभव आहे. कोणतेही पाप अथवा अपराध घडणे त्याच वेळी शक्य आहे जेव्हा मनुष्य बुद्धी आणि विवेकाला पारखा होतो आणि भावना व कामनांच्या प्रवाहात वाहत जाऊन अज्ञान व मूर्खपणाचा मार्ग अवलंबितो. अल्लाह निर्दोष व पवित्र आहे. त्याचे व्यक्तित्व सर्व प्रकारच्या दोषांपासून मुक्त आहे. कोणत्याही प्रकारची उणीव त्याच्यात नाही. तो प्रत्येक कमतरतेपासून दूर आणि सर्व सद्‌गुणांचे भांडार आहे, स्रोत आहे.

या गोष्टीची कल्पनादेखील केली जाऊ शकत नाही की त्याच्यात मूर्खपणा लेशमात्रसुद्धा असू शकेल. तो बुद्धी व विवेकाचा स्रोत, सर्वज्ञ व तत्त्वदर्शी आहे. त्याच्या पवित्र दरबारात अज्ञान व मूर्खपणाला प्रवेश नाही. हेच कारण आहे की कुरआनमध्ये एक दोन ठिकाणीच नव्हे तर अनेक ठिकाणी अल्लाहला प्रभुत्वसंपन्न, तत्त्वदर्शी आणि सर्वज्ञ म्हटले गेले आहे. अर्थात तो पूर्णपणे ज्ञानी व तत्त्वदर्शी आहे, अज्ञान व मूर्खपणाविरहित आहे आणि असीम शक्ती व सत्तेचा स्वामी असूनदेखील व त्याच्याकडून हिशेब घेणारा कोणीही नसताना तो वाटेल त्या पद्धतीने कोणतेही काम हवे तसे करीत नाही. तो जे काही करतो विवेकशीलता आणि तत्त्वदर्शितेने करतो.

''हे मूसा! नि:संदेह मी अल्लाह आहे, अपार शक्तीचा मालक आणि समंजसपणा व विवेकधारी.'' (दिव्य कुरआन - २७ : ९)

''नि:संदेह तुझा पालनकर्ता सर्वज्ञ व तत्त्वदर्शी आहे.'' (दिव्य कुरआन - १२ : ६)

''त्या सर्व वस्तू ज्या आकाशात व पृथ्वीवर आहेत, त्या अल्लाहच्या पावित्र्याचे गुणगान करण्यात व त्याच्या उपासनेत निमग्न आहेत; त्या अल्लाहच्या जो सर्वशासक, अत्यंत गुणवान, प्रभुत्वशाली व तत्त्वदर्शी आहे.'' (दिव्य कुरआन - ६२ : १)

जर अल्लाह तत्त्वदर्शी व सर्वज्ञ आहे तर त्याने निर्माण केलेले अत्यंत विस्तृत ब्रह्मांड निरुद्देश्य व निरर्थक असू शकत नाही. त्याचा एखादा उद्देश आणि त्याच्या पाठीमागे एखादी सुविचारित योजना अवश्य असली पाहिजे. पवित्र कुरआन याची पुष्टी करतो की ते असेच आहे; हे ब्रह्मांड देवतांची लीलाही नाही किंवा अल्लाहने हे एखादे खेळ म्हणून बनविलेले नाही व असेही नव्हे की हे एखाद्या योजनेविना व्यर्थच बनविले आहे आणि विनाउद्देश चालले आहे-

''आणि आम्ही आकाश व पृथ्वी आणि जे काही यांच्या दरम्यान आहे, खेळ म्हणून बनविलेले नाही. आम्ही यांना केवळ सत्याने निर्माण केले; परंतु यांच्यापैकी बहुतेक लोकांना माहीत नाही.'' (दिव्य कुरआन - ४४ : ३८ - ३९)

''नि:संदेह आकाश आणि पृथ्वीच्या रचनेत व रात्र आणि दिवसाच्या एकामागून दुसरा आळीपाळीने येण्यात बुद्धिमान लोकांसाठी अनेक निशाण्या आहेत. हे ते लोक होत जे अल्लाहचे उभे, बसलेले आणि पहुडलेले असता स्मरण करतात (आणि त्याच्या परिणामस्वरूप ते उद्‌गार काढतात की) हे आमच्या पालनकर्त्या! तू हे सर्वकाही व्यर्थ बनविलेले नाही. तू यापासून पवित्र आहेस (की तू एखादे व्यर्थ काम करावे.) तर तू आपल्या नरकाच्या यातनेपासून वाचव.'' (दिव्य कुरआन - ३ : १९०-१९१)

वास्तविकता अशी आहे की या ब्रह्मांडाच्या पाठीमागे एक महान विवेकपूर्ण योजना आहे, ज्याच्या अंतर्गत ब्रह्मांडाची रचना झाली आणि ज्यानुसार याचे नियोजन कार्यान्वित आहे. विज्ञानाचा प्रत्येक अभ्यासक हे मान्य करण्यास बाध्य आहे की ब्रह्मांडात अत्यंत तत्त्वदर्शितापूर्ण उत्तम व सूक्ष्म योजनाबद्धता आहे. ही योजना विश्वाच्या निर्मात्या व स्वामीची दासता व त्याच्याकडून लागू केल्या गेलेल्या नियमांचे व कायद्यांचे पालन होय. ब्रह्मांडाचा लघुत्तम अंश व त्याचा महानतम तारा आणि एकूण संपूर्ण ब्रह्मांड त्याच्या नियमांच्या व कायद्यांच्या शत-प्रतिशत पालनात निमग्न आहेत, त्याच्या दासत्वात मन-मस्तिष्काने समर्पित आणि त्याच्या सत्तेसमोर नतमस्तक झालेले आहेत -

''तुम्ही यावर विचार केला नाही काय की, अल्लाहलाच 'सजदा' (साष्टांग नमस्कार) करतात जे काही आकाशात आहे आणि जे पृथ्वीवर आहे आणि सूर्य, चंद्र, तारे, पर्वत, वृक्ष, जनावरे आणि अनेक माणसे आणि बरेचसे असे लोक आहेत. ज्यांच्यावर (अल्लाहच्या) यातना ठरलेल्या आहेत (कारण ते अल्लाहऐवजी दुसऱ्यासमोर नतमस्तक होतात).'' (दिव्य कुरआन)

मनुष्य या ब्रह्मांडातील सर्वोत्तम कृती आहे. याला अल्लाहने असाधारण योग्यता प्रदान केलेल्या आहेत. याच्या गरजांच्या पूर्ततेसाठी व्यापक व्यवस्था केलेली आहे आणि पृथ्वीवरील सर्व प्राण्यांना व वस्तूंना त्यांच्या अधीनस्थ व ब्रह्मांडातील शक्तींना याचे सेवक बनविले आहे.

''नि:संदेह आम्ही आदम (अ.) यांच्या संततीला श्रेष्ठत्व प्रदान केले आणि खुपकी व

जलमार्गामध्ये त्याच्या राहण्याची व्यवस्था केली आणि त्याला निर्मळ पदार्थांची रोजी दिली व त्याला अशा बहुतेकापेक्षा, ज्यांना आम्ही निर्माण केले, महानता प्रदान केली.''
(दिव्य कुरआन - १७ : ७०)

''सांगा, तोच आहे ज्याने तुम्हाला निर्माण केले आणि तुमच्यासाठी कान, डोळे व हृदय बनविले. परंतु थोडेच लोक कृतज्ञता दर्शवितात.'' (दिव्य कुरआन - ६७ : २३)

''तोच आहे ज्याने तुमच्यासाठी पृथ्वीच्या सर्व वस्तू निर्माण केल्या.''
(दिव्य कुरआन - २ : २९)

''अल्लाहच आहे ज्याने आकाश व धरतीला उत्पन्न केले आणि आकाशातून पाण्याचा वर्षाव केला. मग त्याद्वारे तुमच्यासाठी उपजीविका उपलब्ध करून विविध प्रकारची फळे निर्माण केली व जहाज आणि नौकांना तुमच्या सेवाकार्यात लावले की, समुद्रात त्याच्या आज्ञेने त्यांनी चालावे आणि नद्यांना तुमच्या सेवाकार्यात लावले, सूर्य आणि चंद्राला, जे निरंतर भ्रमण करीत आहेत, तुमच्या सेवाकार्यात लावले आणि दिवस व रात्रीलासुद्धा तुमच्या सेवाकार्यात लावले, तुम्हाला ते सर्वकाही दिले. जे तुम्ही मागितले; जर तुम्ही अल्लाहच्या देणग्यांची गणना करण्याचे ठरविले तर तुम्ही त्या पूर्णपणे मोजू शकणार नाही. वास्तविकत: मनुष्य फार अत्याचारी व कृतघ्न आहे.'' (दिव्य कुरआन - १४ : ३२-३४)

एका अशा प्राण्याची रचना निरुद्देश आणि निरर्थक असू शकत नाही.

''तुम्ही अशी कल्पना केली आहे काय की, आम्ही तुम्हाला व्यर्थ निर्माण केले आहे आणि असे की, तुम्हाला (उत्तर देण्यासाठी) आमच्याकडे परतावयाचे नाही? तर सर्वोच्च आहे अल्लाह, खरा शासक, त्याच्याशिवाय कोणीही पूजनीय नाही. तो स्वामी आहे महिमाशाली सिंहासनाचा.'' (दिव्य कुरआन - २३ : ११५-११६)

ब्रह्मांडाप्रमाणेच मानवजीवनाचा उद्देशसुद्धा अल्लाहचे दासत्व व त्याच्या कायद्यांचे पालन करणे होय.

''ते अल्लाहच्या धर्माशिवाय एखाद्या अन्य धर्माची इच्छा बाळगतात काय? वस्तुस्थिती अशी आहे की, आकाश व पृथ्वीच्या सर्व वस्तू इच्छा असो वा नसो त्याच्याच ताब्यात आहेत आणि त्या सर्वांना त्याच्याचकडे परतावयाचे आहे.''
(दिव्य कुरआन-३: ८३)

''आणि मी 'जिन्न' व माणसाला केवळ अशासाठी निर्माण केले की, त्यांनी माझी उपासना करावी.'' (दिव्य कुरआन - ५१ : ५६)

ब्रह्मांड व त्यातील सर्व वस्तुंप्रमाणे माणसानेसुद्धा अल्लाहच्या उपासनेत व कायद्यांच्या पालनात निमग्न होणे आवश्यक होते; परंतु बऱ्याचशा लोकांचे वागणे याच्या विपरीत आहे. ब्रह्मांडातील अन्य प्राण्यांच्या उलट अल्लाहने माणसांना इच्छा व अधिकाराची जी थोडीशी सूट दिली आहे, त्याचा ते गैरफायदा घेत आहेत आणि अल्लाहऐवजी त्याच्या सृष्टीची उपासना व गुलामी करीत आहेत. अल्लाहच्या कायद्याऐवजी आपल्या इच्छा, आपले

वडिलोपार्जित रीतिरिवाज व आपल्यासारख्याच माणसाने बनविलेल्या कायद्यांचे पालन करीत आहेत. यांच्या उलट काही दुसरे लोक आहेत, जे आपल्या जीवनाचा उद्देश ओळखतात आणि अल्लाहची उपासना व दासत्व आणि त्याच्या कायद्याचे पालन करण्याचे आचरण अवलंबितात. ते अल्लाहव्यतिरिक्त कोणाची उपासना व गुलामीही करीत नाहीत आणि कोणाची गुलामगिरी व आज्ञाधारकताही स्वीकारीत नाहीत.

हे दोन गट आहेत एक दुसऱ्याच्या उलट दिशेत प्रवास करणारे. एक गट आपल्या जीवनाचा उद्देश ओळखतो, अल्लाहचे दासत्व व त्याच्याशी प्रामाणिकपणाचा मार्ग अवलंबितो, चांगुलपणा, ईशपरायणता व उच्च मानवी मूल्यांच्या आधारे आपले सामाजिक जीवन निर्माण करतो, अल्लाहच्या पृथ्वीवर अल्लाहची इच्छा पुरी करतो आणि त्याच्या साम्राज्यात त्याचीच सत्ता स्थापित करतो. या गटाच्या सर्व योग्यता व क्षमता आणि त्याच्या अंतर्गत पृथ्वीची सर्व साधने, अल्लाहभक्ती, चांगुलपणा निर्माण व विकासकार्यात लावतो, येथपावेतो की, या मार्गात आपले प्रिय प्राण, आपली संतती व निकटसंबंधियांचासुद्धा बळी देतो. हा अल्लाहच्या आज्ञाधारकांचा गट आहे; हे सत्य व सदाचारासाठी प्राणार्पण करण्याऱ्यांचा दल आहे. हे सत्यता, नैतिकता, मानवता व चांगुलपणाच्या रक्षकांचे मंडळ आहे, ही अल्लाहची पार्टी आहे. आदरणीय इसा मसीह (अ.) म्हणजे येशू ख्रिस्तांच्या शब्दांत, हे मंडळ पृथ्वीचे मीठ आणि पर्वताचे दीप होय.

एक दुसरा गट आहे. हा आपल्या जीवनाच्या उद्देशाकडून तोंड फिरवितो. अल्लाहच्या उपासना व आज्ञाधारकतेऐवजी त्याच्याविरुद्ध बंडाचा मार्ग अवलंबितो. भलेपणा, अल्लाहची भक्ती आणि मानवतेऐवजी दुश्चरित्र, निधर्मिता, बहुदेववाद, नास्तिकता आणि दुष्टपणाचा मार्ग अवलंबितो. हा गट आपल्या व दुसऱ्यांच्या योग्यता व सामर्थ्याचा व आपल्या अधीन असलेल्या नैसर्गिक साधनांचा अल्लाहची अवज्ञा, दंगे-धोपे, बिघाड, हत्याकांड व लूटमार आणि नैतिकता भंग करण्याच्या कामी प्रयोग करतो. हा सत्य व सत्यमार्गावर चालणाऱ्यांचा शत्रू असतो, त्यांच्यावर तो चिखलफेक करतो व त्यांना मुळासकट उखडून टाकण्यात कोणतीही उणीव बाकी ठेवत नाही. हा अल्लाहशी बंडखोरी करणाऱ्या, दुराचार पसरविणाऱ्या, विनाश, दंगे-धोपे व बिघाडाच्या ध्वजवाहकांची आणि सत्य व सदाचाराच्या शत्रूंचा गट आहे. ही सैतानांची पार्टी आहे धरणीला भार मानवतेच्या अपमान व लज्जेचे कारण.

दोन्ही गट तत्त्वदर्शी व सर्वज्ञ अल्लाहच्या दृष्टीने समान असू शकतात काय? पहिला गट अल्लाहला प्रिय व दुसरा गट अल्लाहला अप्रिय असू नये काय? दोन्ही गटांचा परिणाम एकसमान असला पाहिजे की दोघांना मृत्यू येऊन दोघांनी मातीत मिसळावे व कोणालाही पुरस्कार अथवा शिक्षा मिळू नये काय? जर असे असेल तर कोण म्हणू शकेल की हे जग एक तत्त्वदर्शितापूर्ण सृष्टी आहे आणि याचा सृजनकर्ता व व्यवस्थापक तत्त्वदर्शी व बुद्धिसंपन्न एखादे व्यक्तित्व आहे? मग तर (अल्लाहचा आश्रय) असेच म्हटले जाईल की हे जग अंधेर नगरी आहे आणि याचा राजा चौपट राजा आहे; तेव्हा तर भाजी व खाजा एकाच

दराने विकले जात आहेत.

पवित्र कुरआन म्हणतो की असे नाही व असे असूही शकत नाही. अल्लाह तत्त्वदर्शी व बुद्धिसंपन्न आहे. त्याच्या दृष्टीत दोन्ही गट समान नाहीत. म्हणून त्यांचा परिणामसुद्धा एकसमान असू शकत नाही. आज्ञाधारकांना निश्‍चितच बक्षीस मिळेल आणि अवज्ञा करणाऱ्यांना व बंडखोरांना शिक्षा मिळेल. परंतु या जगात नव्हे, कारण हे जग मोबदला प्राप्त करण्याचे स्थळ नसून कर्मस्थळ व परीक्षास्थळ आहे. हे जग समाप्त झाल्यानंतर कर्मांचे फळ व मोबदला मिळण्याचे जग (लोक) अस्तित्त्वात येईल, जेथे अल्लाहचे न्यायालय असेल, हिशेब होईल; त्या दिवशी व त्या जागी प्रत्येक माणसाला यथायोग्य न्याय मिळेल आणि प्रत्येक व्यक्तीला आपण केलेल्या कर्मांचे पुरेपूर फळ मिळेल. असे घडणे अल्लाहच्या तत्त्वदर्शिता व बुद्धिमत्तेची निकड आहे आणि असे निश्चितपणे घडून राहील.

"आणि आंधळा व डोळस समान असू शकत नाहीत आणि अंधार व प्रकाश; छाया व सूर्याची उष्णता, जिवंत व मृत एकसमान असू शकत नाहीत."

(दिव्य कुरआन, ३५ : १९-२२)

"आणि आम्ही या आकाश व पृथ्वीला आणि जे काही या दोहोंच्या दरम्यान आहे ते व्यर्थ उत्पन्न केले नाही. ही तर त्या लोकांची गैरसमजूत आहे ज्यांनी इन्कार केला. तर त्या लोकांसाठी, ज्यांनी द्रोह केला आहे. नरकाच्या रूपात विनाश आहे. काय आम्ही श्रद्धावंतांना व चांगुलपणा करणाऱ्यांना पृथ्वीवर बिघाड उत्पन्न करणाऱ्यांच्या बरोबरीचे बनवू? की अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांना (परिणामाच्या दृष्टीने) बंडखोर व दुराचाऱ्यांच्या बरोबरीचे बनवू?" (दिव्य कुरआन - ३८ : २७-२८)

"तर काय आम्ही आज्ञाधारकांना व अपराध्यांना (अवज्ञाकारी व बंडखोर) बरोबरीचे करू? काय झाले आहे तुम्हाला? तुम्ही काय निर्णय करता?"

(दिव्य कुरआन - ६८ : ३५-३६)

"प्रशंसा व धन्यवाद अल्लाहसाठी आहे, जो त्या प्रत्येक वस्तूचा स्वामी आहे, ज्या आकाशात आहेत व ज्या पृथ्वीवर आहेत आणि अंतिम दिनीसुद्धा त्याच्यासाठीच प्रशंसा आहे; तो तत्त्वदर्शी आहे आणि खबर राखणारा आहे. त्याला माहीत आहे जे काही जमिनीत जाते व जे काही त्याच्यातून निघते आणि जे काही आकाशातून उतरते व जे काही त्याच्यात चढते, तो दयावान व मोठा क्षमाशील आहे. ज्यांनी इन्कार केला, ते म्हणतात की आम्हावर तर ती वेळ (अंतिम दिन) येणार नाही. सांगा, का नाही? माझ्या पालनकर्त्याची शपथ! त्याच्यापासून कणभरसुद्धा कोणतीही गोष्ट अदृश्य नाही. आकाशातीलही नाही की जमिनीवरीलही नाही. याच्यापेक्षा लहानही नाही आणि याच्यापेक्षा मोठीही नाही. सर्वकाही उघड्या ग्रंथात अंकित आहे. (प्रलयकाळ येईल) जेणेकरून त्याने त्या लोकांना मोबदला द्यावा, ज्यांनी श्रद्धा बाळगली आणि अनुकूल कर्म केले. हे ते लोक आहेत ज्यांच्याकरिता क्षमा आहे आणि सन्मान्य रोजी आणि ज्या लोकांनी आमच्या आयतींना

खाली पाहावयास लावण्यासाठी धावपळ केली त्यांच्यासाठी फारच वाईट प्रकारच्या दु:खदायी यातना आहेत.'' (दिव्य कुरआन - ३४ : १-५)

या आयतीत अल्लाह स्वामी व शासक, तत्त्वदर्शी व बुद्धिसंपन्न आणि ज्ञानी व सतर्क असल्यामुळे परलोकातील पुरस्कार व शिक्षा, स्वर्ग व नरक अस्तित्त्वात येण्यासंबंधी प्रमाण एकत्रित केले गेले आहेत व सांगितले गेले आहे की जर तो सर्व काही जाणूनसुद्धा जगात दुष्कर्म करणाऱ्यांना शिक्षा देत नाही, तर याचे कारण असेही आहे की तो दयाळू व अत्यंत क्षमाशील आहे. तो वारंवार संधी देत जातो की वेळ समाप्त होईल, तेव्हा त्याच्या न्यायाचा तराजू कायम होईल आणि चांगल्या लोकांना त्यांच्या चांगुलपणाचे फळ आणि वाईट लोकांना अपकृत्यांची शिक्षा मिळाल्याशिवाय राहाणार नाही.

तत्त्वदर्शी व बुद्धिसंपन्न असण्याबरोबरच अल्लाह गुणग्राहीसुद्धा आहे. प्रत्येक कृपाळू स्वामीप्रमाणे तो कृतज्ञता व आज्ञाधारकतेचा गुणग्राहक आहे, जे लोक त्याच्याशी प्रामाणिक आहेत, जे प्राण, संपत्ती, संतती, नातेवाईक यासारख्या कोणत्याही गोष्टीला त्याच्याप्रति असलेल्या प्रामाणिकतेवर प्राधान्य देत नाहीत, जे आपले सर्वस्व त्याच्या मार्गात लावतात आणि केवळ अशासाठी लावतात की त्यांचा उपकारकर्ता व स्वामी त्यांच्यावर प्रसन्न व्हावा. जेव्हा ते आपले जीवन त्याच्या चरणी अर्पित करून त्याच्याजवळ पोहचतील, तेव्हा तो त्यांचा अनादर करणार नाही. त्यांचे सत्कर्म व त्यांचा त्याग निष्फळ होऊ देणार नाही, तर त्यांच्या प्रत्येक कर्माचे शेकडोपट अधिक फळ देऊन त्यांना प्रसन्न करील, त्यांच्यावर आपल्या शाश्वत प्रसन्नतेचा वर्षाव करील, त्यांना आपल्या संपर्काचे सुख प्रदान करील आणि आपल्या सौंदर्याच्या कांतीने त्यांच्या डोळ्यांना शीतलता व हृदयाला चिरशांती देऊन आनंदाने उल्हासित करील. असा आहे अल्लाह आपल्याशी प्रामाणिक असलेल्यांचा व प्राण समर्पित करणाऱ्यांचा गुणग्राहक व कदर करणारा.

''नि:संदेह जे लोक अल्लाहच्या ग्रंथाचे पठण करतात. नमाज पढतात आणि आम्ही जे काही त्यांना दिले आहे, त्यातून उघडपणे व गुप्तपणे खर्च करतात, ते अशा व्यापाराची आशा बाळगतात, जो कधी नष्ट होणार नाही. परिणामत: अल्लाह त्यांना त्यांच्या कर्माचा पुरेपूर मोबदला देईल आणि आपल्या कृपेने तो अधिक वाढवून देईल. नि:संदेह तो फार क्षमाशील व गुणग्राहक आहे... मग आम्ही या ग्रंथाचे उत्तराधिकारी आपल्या त्या दासांना बनविले ज्यांची आम्ही निवड केली. तर त्यांच्यापैकी काही तर आपल्यावर अत्याचार करणारे आहेत आणि त्यांच्यात काही मध्यममार्गी आहेत आणि काहीजण अल्लाहच्या अनुमतीने पुण्यकार्यात अग्रेसर राहणारे आहेत, हीच (अल्लाहची) फार मोठी कृपा आहे. ते स्थायी स्वर्गात प्रवेश करतील जेथे त्यांना सोन्याचे चुडे व मोत्यांनी विभूषित केले जाईल आणि तेथे त्यांची वस्त्रे रेशमी असतील आणि ते म्हणतील की प्रशंसा (स्तुति व कृतज्ञता) आहे त्या अल्लाहसाठी ज्याने आमची (सर्व) दु:खे दूर केली. नि:संदेह, आमचा पालनकर्ता मोठा क्षमाशील व गुणग्राहक आहे. ज्याने आपल्या कृपेने आम्हाला (सदैव) राहणाऱ्या जागी ठेवले जेथे कोणतेही कष्ट पोचणार नाही आणि आम्हाला थकवा व कंटाळाही येणार

नाही.'' (दिव्य कुरआन - ३५ : २९-३०, ३२-३५)

हाच अर्थ थोडक्यात पवित्र कुरआनने इतरात्र अशा तऱ्हेने सांगितला आहे -

''जर तुम्ही अल्लाहला कर्ज दिले. चांगले कर्ज, तर तो तुमच्यासाठी ते अनेकपट करील व तुम्हाला क्षमा करील, अल्लाह मोठा गुणग्राहक व सहनशील आहे. तो परोक्ष व प्रत्यक्षाचे ज्ञान बाळगणारा. प्रभुत्वशाली व तत्त्वदर्शी आहे.'' (दिव्य कुरआन - ६४ : १७-१८)

अल्लाह गुणग्राहक, सर्वज्ञ, प्रभुत्वशाली व तत्त्वदर्शी आहे. या सर्व विशेषणांची निकड अशी आहे की त्याने चांगल्या लोकांना त्यांच्या चांगुलपणाचा भरपूर मोबदला द्यावा आणि आपल्या कृपेने आणखी अधिक पुरस्कृत करावे, नि:संदेह तो असेच करील. शिवाय तो फार मोठा क्षमाशील व विनम्र आहे. तो आपल्याशी प्रामाणिक असलेल्यांची भूल-चूक माफ करणारा व त्यांच्या उणिवांकडे दुर्लक्ष करणारा आहे आणि नि:संदेह तो असेच करील. तो त्यांना आपल्या कृपेच्या शीतल छायेत घेईल व क्षमा व कृपेचा त्यांच्यावर वर्षाव करील.

''न्यायप्रिय असण्याबरोबरच अल्लाह महान दयाळूसुद्धा आहे. दया व कृपा त्याचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य होय. येथपावेतो की, 'अल्लाह'सारखेच त्याचे दुसरे नाव परमदयाळू आहे. (हे प्रेषित!) सांगा, त्याचा 'अल्लाह' म्हणून धावा करा अथवा 'कृपाळू' म्हणून अथवा हवे त्या नावाने संबोधन करा. सर्व चांगली नावे त्याचीच आहेत.''

(दिव्य कुरआन - १७ : ११०)

त्याच्या दयेने सर्व वस्तूंना आच्छादिले आहे. कोणतीही वस्तू असो, तोच तिला अस्तित्त्व प्रदान करतो, तोच तिचा विकास करतो व तोच तिच्या गरजा पूर्ण करतो आणि यांच्यापैकी प्रत्येक गोष्ट 'कृपा' आहे.

''आणि माझ्या दयेने प्रत्येक वस्तू आच्छादिली आहे.'' (दिव्य कुरआन - ७ : १५६)

आणि मानवजातीवर तर त्याच्या दयेची कोणतीही सीमा नाही. अस्तित्त्वच खुद्द एक महान देणगी आहे. मानवअस्तित्त्व तर याच्यापेक्षाही मोठी देणगी आहे. मानव-शरीराच्या रूपाने अल्लाहने मनुष्याला जितके अवयव प्रदान केले आहेत, त्यांच्यापैकी प्रत्येक अवयव अत्यंत जटिल, अत्यंत बुद्धिमत्तापूर्ण, अत्यंत उपयोगी व अनेक उद्देशांची पूर्तता करणारा आहे आणि अल्लाहची अत्यंत अद्‌भुत व अनुपम देणगी आहे. दुसऱ्या प्राण्यांच्या तुलनेत मनुष्याला असाधरण योग्यता व क्षमता दिल्या गेल्या आहेत, इतक्या जास्त की, कोणत्याही प्रकारे त्यांचे वर्णन करणे कठीण आहे आणि इतक्या असाधारण की, स्वत: मनुष्य त्यांची कल्पना करण्यास असमर्थ आहे. याच योग्यता व क्षमतांचा लाभ घेऊन मनुष्य पृथ्वी ते अंतरिक्षपर्यंत व अंतरिक्षापासून ग्रहापर्यंत प्रत्येक वस्तूला वशीभूत करण्याचा प्रयत्न करीत आहे. यापैकी प्रत्येक योग्यता व क्षमता खुद्द एक महान देणगी आहे. याशिवाय मानवाच्या सर्वांगीण गरजांच्या पूर्ततेसाठी पृथ्वीवर, समुद्रात, वातावरणात, अंतरिक्षात, तारे, ग्रह-उपग्रहात असीम भांडार ठेवलेले आहेत, जे वाढतच चाललेले आहेत. ज्या प्रमाणात

माणसाच्या गरजा वाढत आहेत, त्याच्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात त्याच्या गरजांच्या पूर्ततेची साधने उपलब्ध होत आहेत. कोळशाचा शोध लागला, पेट्रोलचा शोध लागला, नवनवीन धातू, खनिज पदार्थ, साबण व गॅस सापडले. वाफेच्या शक्तीचा शोध लागला, विजेचा अविष्कार झाला, नवनवीन किरणांचा शोध लागला, परमाणु शक्तीचा शोध लागला आणि आता अंतराळात तारे, ग्रह, उपग्रहांच्या शक्ती आणि खनिजपदार्थ व गॅसेस मनुष्याच्या हाती लागणार आहेत भविष्यकाळात न कळे की आणखी काय हाती येणार आहे. यांच्यापैकी प्रत्येक वस्तु आणि प्रत्येक शक्ती एक मोठी देणगी आहे.

अल्लाहने मनुष्याच्या अनंत गरजांचीच नव्हे तर त्याच्या आवडी व आकांक्षाच्या तृप्तीची साधनेसुद्धा विपुल प्रमाणात उपलब्ध करून दिली आहेत. उदाहरणार्थ, मनुष्य सौंदर्यप्रेमी आहे. तर त्याच्या सौंदर्याभिलाषेच्या पूर्ततेसाठी पृथ्वी ते आकाशापर्यंत त्याने सौंदर्याची छटा विखुरली आहे. हिरवळ, फुलाने भरलेली उपवने, रूप-सौंदर्याने सुशोभित वाटिका, हिमाच्छादित शिखर नयनरम्य पर्वत शृंखला, चित्ताकर्षक दऱ्या, डोलणारी शेते, सुंदर पशू-पक्षी, सौंदर्यपूर्ण मानव-आकृती, लखलखणाऱ्या ताऱ्यांनी भरलेले आकाश, चंद्र व चंद्रप्रकाशाने मदोन्मत रात्र, उगवणारी उषा, सूर्योदय आणि सूर्यास्ताचे मनोहर दृश्य, मनमोहक धबधबे आणि समुद्रतटाची आकर्षक दृश्ये हे सर्व काय आहे? मानवाच्या सौंदर्यचेतना व अभिरूचीला तृप्त करणारी साधने! याच आधारे दुसऱ्या आवडी आणि इच्छांची कल्पनासुद्धा आपण करू शकता.

परम दयाळू अल्लाहने माणसाच्या भौतिक गरजांचीच पूर्तता केलेली आहे असे नाही, तर त्याच्या नैतिक व आध्यात्मिक गरजांच्या पूर्ततेचीसुद्धा व्यवस्था केली आहे. त्याची सर्वांत मोठी आवश्यकता अशी होती की, त्याने जगात जीवन कसे जगावे, जेणेकरून त्याच्या स्वत:च्या योग्यता व क्षमता आणि अल्लाहने प्रदान केलेल्या असीम साधनांचा योग्य प्रकारे त्याने उपयोग करावा, त्याचे जीवन सफल व्हावे व त्याने विनाश व विध्वंसापासून दूर राहावे. अल्लाहने मनुष्याच्या या सर्वांत मोठ्या आवश्यकतेच्या पूर्ततेची व्यवस्था केली, त्याच्या शिकवण व मार्गदर्शनासाठी पवित्र ग्रंथ अवतरित केले आणि प्रेषितांची एक मालिका सुरू केली जेणेकरून मनुष्याने मार्गभ्रष्टतेपासून व विनाश आणि विध्वंसापासून अलिप्त राहावे. हे सर्व काय आहे? अल्लाहच्या असीम दयाळूपणाचे प्रकटीकरण!

‘‘अल्लाहने मनुष्याला एका थेंबापासून (वीर्यबिंदू) उत्पन्न केले, तर प्रत्यक्ष पाहा तो भांडखोर झाला आणि अल्लाहने पशूंना निर्माण केले. तुमच्यासाठी त्यांच्यात थंडीपासून बचाव करण्याचे साहित्य (लोकर व कातडे) आहे. बरेचसे दुसरे फायदेसुद्धा आहेत आणि त्यांचेच मांस तुम्ही खाता. तुमच्यासाठी त्यांच्यात सौंदर्य व शोभा आहे; त्यावेळी जेव्हा तुम्ही त्यांना चारून आणता आणि चरावयास नेता आणि ते तुमचे ओझे अशा प्रदेशापर्यंत वाहून नेतात जेथे तुम्ही जीवघेण्या परिश्रमाशिवाय पोचू शकत नव्हता. निस्संदेह तुमचा प्रभू करुणामय व दयावान आहे. त्याने घोडे, खेचर व गाढवांना निर्माण केले, जेणेकरून तुम्ही त्यांच्यावर स्वार व्हावे, आणि त्यांनी तुमच्या शोभेचे साधनसुद्धा बनावे. तो अशा अनेक

गोष्टींना निर्माण करतो ज्यांना तुम्ही जाणत नाही आणि अल्लाहपर्यंत सरळ मार्ग जातो. काही मार्ग वाकडेसुद्धा असतात. जर त्याने इच्छिले असते तर तुम्हा सर्वांना सरळ केले असते. मार्गदर्शन केले असते, तोच आहे ज्याने आकाशातून पाण्याचा वर्षाव केला, तुमच्यासाठी त्यात पिण्याची सामुग्री आहे आणि त्यानेच वृक्षे-रोपे उगवतात, ज्यात तुम्ही जनावरे चारता. त्या पाण्याने तो तुमच्यासाठी शेती, ऑलिव्ह, खजूर, द्राक्षे आणि सर्व प्रकारची फळे उत्पन्न करतो. नि:संदेह यात त्या लोकांसाठी मोठ्या निशाण्या आहेत. जे विचार, विवेकाचा उपयोग करतात. त्याने तुमच्या लाभासाठी रात्र व दिवसाला आणि सूर्य व चंद्राला कामाला लावून ठेवले आहे आणि त्याच्याच आज्ञेने तारेदेखील कामाला लागले आहेत. निश्चितपणे यात बुद्धीचा उपयोग करणाऱ्यांसाठी मोठ्या निशाण्या आहेत. अल्लाहने तुमच्यासाठी पृथ्वीवर रंगीबेरंगी वस्तु उत्पन्न केल्या आहेत. निश्चितच यातसुद्धा लक्ष देणाऱ्यांसाठी मोठ्या निशाण्या आहेत आणि तोच तर आहे ज्याने समुद्रात सेवाकार्यात लावले आहे, जेणेकरून तुम्ही त्यातून ताजे मांस (मासे) खावे आणि त्यातून दागिने (मोती, प्रवाळ वगैरे) काढावेत जे तुम्ही घालता. तुम्ही पाहता की नौका त्याच्या (समुद्राच्या) छातीवर चालते (जेणेकरून तुम्ही प्रवास करू शकावे) आणि त्याचा अनुग्रह (रोजी) शोधावा आणि त्याचे उपकार मानावे. त्याने पृथ्वीवर अचल पर्वत ठेवले जेणेकरून पृथ्वी तुम्हाला घेऊन लवंडू नये आणि नद्या बनविल्या आणि नैसर्गिक मार्ग बनविले जेणेकरून तुम्ही योग्य मार्ग प्राप्त करू शकावे आणि मार्ग दर्शविणारी अनेक चिन्हेसुद्धा बनविली आणि ताऱ्यांद्वारेदेखील लोकांना मार्ग सापडतो. तर जो निर्माण करतो, तो त्यासमान आहे काय? जो निर्माण करीत नाही? तुम्ही याचा विचार करीत नाही काय? आणि जर तुम्ही अल्लाहच्या देणग्यांची गणना करण्याचे ठरविले तर गणना करू शकणार नाही. नि:संदेह, अल्लाह मोठा क्षमाशील व दया करणारा आहे.'' (दिव्य कुरआन - १६ : ४ - १८)

पवित्र कुरआनमध्ये अशाचप्रकारे जागोजागी अल्लाहच्या देणग्यांचा उल्लेख केला गेला आहे. जेणेकरून मनुष्याने आपल्या महादयाळू व परम कृपाळू अल्लाहला ओळखावे. त्याच्या देणग्यांची जाणीव ठेवून त्याच्याप्रति पूर्णपणे कृतज्ञ बनावे, आपल्या संपूर्ण अस्तित्त्वासह त्याच्या उपसनेत लागावे आणि त्याच्याद्वारे प्रदान केल्या गेलेल्या देणग्यांना अन्य कोणाच्या उपासनेत व प्रसन्नतेसाठी लावू नये.

हा वास्तविकतेचा एक पैलू आहे. वास्तविकतेचा दुसरा पैलू असा आहे की या जगात स्वत:ची समस्त व्यापकता व विस्तार असूनदेखील त्यात अल्लाहचा असीम दयाळूपणा व कृपेची पराकाष्ठा आणि पूर्तता करण्याची क्षमता नाही. येथे मनुष्याला अल्लाहची दया किती का प्राप्त होईना, तरीसुद्धा कोणत्याही मोठ्यात मोठ्या माणसालासुद्धा या जगात ते सर्वकाही प्राप्त होत नाही, ज्याची तो इच्छा बाळगतो. मग जनसाधारणबद्दल काय म्हणावे! मग ज्या देणग्या मनुष्याला प्राप्त होतात त्यासुद्धा त्रास, संकटे व धोक्यासह प्राप्त होतात, कधीही असे घडत नाही की देणग्याच देणग्या असाव्यात, त्रास, धोके व दु:ख असू नये. शिवाय या देणग्या प्राप्त झाल्यानंतर हिरावूनसुद्धा घेतल्या जातात. आरोग्य मिळते तर ते

रोगात परिवर्तित होते, तारुण्य मिळते तर वृद्धावस्थेसाठी जागा मोकळी सोडली जाते, संपत्ती मिळते तर ती फसवून निघून जाते, सत्ता हाती येते तर ती समाप्त होते, अशीच स्थिती जगातील अन्य सर्व देणग्यांचीसुद्धा आहे की त्यांना टिकाऊपणा नाही आणि देणग्या सामान्य स्थितीत जरी हिरावून घेतल्या गेल्या नाहीत तरी मृत्यूपासून सुटका नाही. मृत्यू मनुष्याच्या अस्तित्त्वासहित सर्व काही हिसकावून घेऊन जातो. तो माणसाकडून त्याच्या नातेवाईकांना व त्याच्या प्राणप्रिय प्रियजनांना हिसकावून घेतो आणि मनुष्य दुःख व पश्चात्ताप करीत राहतो. हे एक असे संकट आहे की त्याची आठवणसुद्धा माणसाच्या हृदयातील सुखशांतीला छिन्नभिन्न करून टाकते आणि मोठमोठ्या ऐश्वर्य व शांतीवर पोतेरे फिरविते. मनुष्य खूप इच्छितो की या संकटापासून मुक्ती मिळावी, परंतु ती मिळत नाही. मनुष्य मनापासून इच्छितो की त्याला चिरस्थायी जीवन मिळावे, परंतु थोड्याच दिवसांपर्यंत तो जीवनाचा आनंद लुटून अन्य मानसिकतेने या जगातून निघून जातो.

याशिवाय या जगाचा एक अन्य पैलूसुद्धा आहे. हे परीक्षास्थळ आहे. येथे त्या लोकांची विशेष परीक्षा घेतली जाते जे ईश्वराशी प्रामाणिक राहण्याचा संकल्प करतात. त्यांच्यापुढे कठोरतम कसोट्या येतात. त्यांना सुख व शांतीपासून वंचित केले जाते. संकटे, यातना, कारावास व फाशीचे दोर त्यांचे स्वागत करतात. अल्लाहचा धर्म त्यांच्याकडून त्यांच्या लाभ, संबंध, इच्छा आणि प्राण व संपत्ती प्रत्येक गोष्टीच्या त्यागाची अपेक्षा करतो व जेव्हा ते या गोष्टींचा त्याग करतात आणि या कसोट्यांवर चोख ठरवतात, तेव्हा त्यांना प्रामाणिकपणाचे प्रमाणपत्र प्राप्त होते.

''आणि निःसंदेह आम्ही तुमची परीक्षा घेऊ कधी भयाने, कधी भुकेने, कधी प्राण-संपत्ती आणि उत्पन्नाच्या नुकसानीने आणि (हे प्रेषित!) धैर्यवान लोकांना शुभवार्ता द्या.''

(दिव्य कुरआन - २ : १५५)

या उलट जगाची भक्ती करणारे, इन्कार करणारे व धर्माविरुद्ध आचरण करणारे व ईशत्वात दुसऱ्यांना भागीदार करणाऱ्यांच्या हिश्यात जगातील देणग्या येतात आणि ते भरपूर भोगविलास करतात. असे वाटते की जग श्रद्धावंतांसाठी कैदखाना व विधर्मियांसाठी स्वर्ग आहे. (हदीसमध्ये आहे की अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले की जग श्रद्धावंतांसाठी कैदखाना व नास्तिक आणि विधर्मी लोकांसाठी स्वर्ग आहे.) त्यामुळे ही परिस्थिती श्रद्धावंतांसाठी आणखीनच अधिक कठोर कसोटी बनते.

जर अल्लाह महादयाळू व कृपाळू आहे, जर त्याचा दयाळूपणा व कृपा अनंत आहे आणि जर तो सर्वशक्तिमान आहे, तर एक असे जग (लोक) असावयास पाहिजे की जेथे त्याच्या कृपेची परिपूर्ती व्हावी, जेथे मानवाला अपार देणग्या मिळाव्यात, त्या सर्व देणग्या ज्यांची तो इच्छा करतो अथवा ज्यांची कल्पना करील आणि ज्यांची कल्पना करू शकणार नाही. जेथे देणग्यांबरोबर भीती, शोक अथवा दुःखाचा समावेश नसावा, जेथे देणग्या मिळाल्यावर त्या लुप्त होण्याची भीती नसावी, जेथे मृत्यू नसावा, पतन नसावे, वृद्धत्व व रोगराई नसावी आणि जेथे अल्लाहच्या कृपा व दयेचा त्याच्या आज्ञाधारक दासावर वर्षाव

व्हावा, अशाच जगाचे (लोकाचे) नाव स्वर्ग आहे -

''(हे प्रेषित!) त्यांना विचारा : कोणाच्या आहेत त्या सर्व वस्तू ज्या आकाशात व जमिनीत आहेत? सांगा, अल्लाहच्या, त्याने दयाळूपणाला स्वत:वर अनिवार्य करून घेतले आहे. तो तुम्हा सर्वांना प्रलयकाळच्या दिवशी अवश्य एकत्र करील. यात कोणतीच शंका नाही.'' (दिव्य कुरआन - ६ : १२)

अर्थात अंतिम प्रलयाच्या दिवशी सर्व मानवांना एकत्र करणे अल्लाहच्या दयाळूपणाचा एक अनिवार्य भाग आहे -

''ज्या देवदूतांनी सिंहासन उचलून धरले आहे आणि जे त्याच्या चोहोबाजूस (घेरून) आहेत. आपल्या पालनकर्त्याच्या प्रशंसेबरोबर गुणगान करीत आहेत आणि त्यावर श्रद्धा बाळगतात आणि श्रद्धा बाळगणाऱ्यांसाठी क्षमेची प्रार्थना करतात. ते म्हणतात की, हे आमच्या पालनकर्त्या! तू आपल्या दयाळूपणा व ज्ञानाने प्रत्येक वस्तूस आच्छादिले आहे, तर ज्या लोकांनी पश्चात्ताप केला आणि जे तुझ्या मार्गावर चालतील, त्यांना क्षमा आणि त्यांना धगधगत्या अग्नी (नरक) च्या यातनांपासून वाचव. हे आमच्या पालनकर्त्या ! त्यांना सदैव टिकणाऱ्या स्वर्गामध्ये दाखल कर, ज्याचे तू त्यांना वचन दिले आहे आणि त्यांच्या पूर्वज, त्यांच्या पत्नी व त्यांच्या संततीपैकी जे कोणी पुण्यशील असतील, त्यांनासुद्धा. नि:संदेह तू प्रभुत्वशाली आणि तत्त्वदर्शी आहेस आणि त्यांचे वाईट गोष्टींपासून रक्षण कर आणि ज्याला त्या दिवशी तू यातनापासून वाचविले तर निश्चितपणे तू त्यांच्यावर दया केली आणि हेच सर्वांत मोठे यश होय.'' (दिव्य कुरआन - ४० : ७-९)

अर्थात अल्लाहच्या व्यापक दयाळूपणाची निकड आहे की श्रद्धावंतांना स्वर्गाच्या चिरस्थायी देणग्यांनी संपन्न करावे, सर्व प्रकारच्या पारलौकिक संकट व आपत्तींपासून त्यांचे संरक्षण करावे आणि त्यांच्या प्रियजनांना व नातेवाईकांना जर ते स्वर्गात जाण्यायोग्य असतील तर स्वर्गात त्यांच्याबरोबर ठेवावे, जेणेकरून त्यांनी मिळून मिसळून स्वर्गाच्या देणग्यांनी लाभान्वित व आनंदित होऊ शकावे.

''आणि स्वर्ग भीती बाळगणाऱ्यांसाठी तयार केले जाईल व ते त्यांच्यापासून दूर नसेल. असे आहे ते स्वर्ग ज्याचा वायदा तुमच्याशी केला गेला होता. म्हणजे त्या प्रत्येक माणसाशी जो (अल्लाहकडे) वारंवार परतणारा व (धर्माच्या बाबतीत आपल्या) कर्तव्याचे पालन करणारा असेल, जो त्याला न पाहता कृपाळू अल्लाहचे भय बाळगत असेल आणि (त्याच्यासमोर) समर्पित भावाने भरलेल्या हृदयाने येईल. प्रवेश करा स्वर्गात सुख-शांती व सुरक्षेसह, हा अमरतेचा दिवस आहे. येथे यांच्यासाठी ते सर्व काही आहे जे हे इच्छितील आणि आमच्याजवळ याच्यापेक्षा अधिक देणग्यासुद्धा आहेत.''

(दिव्य कुरआन-५०:३१-३५)

म्हणजे त्यांनी कृपाशील अल्लाहला प्रसन्न केले. ज्याचा परिणाम असा झाला की ते असल्या स्वर्गाचे अधिकारी बनले जेथे शांतीच शांती आहे. जेथे कोणतेही भय, कोणतेही

दुःख आणि कोणताही शोक नाही. जेथे मृत्यू आणि नश्वरता पोचू शकत नाही, जेथे जीवन अमर आणि देणग्यासुद्धा सदैव राहणाऱ्या, जेथे अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांना त्या सर्व देणग्या आणि सुखशांती व विलासाच्या वस्तु मिळतील, ज्या ते इच्छितील आणि यांव्यतिरिक्त आणखी अनेक देणग्या मिळतील ज्या कृपाशील अल्लाह त्यांना देण्याचे ठरवील.

"हे माझ्या दासांनो! आज तुम्हाला कोणतेही भय नाही आणि तुम्ही दुःखीसुध्दा होणार नाही. तुम्ही ते लोक आहात ज्यांनी आमच्या आयती (वचने) वर श्रद्धा बाळगली आणि जे आज्ञाकारी (मुस्लिम) होते, तुम्ही आणि तुमच्या पत्नी सर्वजण स्वर्गात प्रवेश करा. तेथे तुम्ही विलास कराल. तुमच्या समोर सोन्याची ताटे व पेले येतील. स्वर्गात तुम्हाला त्या सर्व वस्तू मिळतील ज्यांची इच्छा तुमची मने करतील आणि ज्याने तुमच्या डोळ्यांना तृप्ती प्राप्त होईल आणि ते प्रसन्नतेचा अनुभव करतील आणि तुम्ही त्या स्वर्गात सदैव राहाल."

(दिव्य कुरआन - ४३ : ६८-७१)

तात्पर्य असे की, स्वर्गात शोक आणि भयाचे नावदेखील नसेल. तेथे सुख-शांती, सुख-ऐश्वर्य, विश्रांती, आनंद-विलास असेल आणि मनोरंजक गोष्टींचे बाहुल्य असेल आणि हे सर्व काही अमर असेल, सदासर्वदा राहील.

पवित्र कुरआनमध्ये एके ठिकाणी स्वर्गातील देणग्यांचा विस्तारपूर्वक उल्लेख केल्यानंतर म्हटले गेले आहे -

"आणि स्वर्गात राहणारे एकमेकांकडे तोंड करून हालअहवाल विचारतील. ते (एकदुसऱ्याला) सांगतील की, आम्ही येथे येण्यापूर्वी (जगात) आपल्या घरच्या मंडळींना भीत होतो (की न जाणो आमचा शेवट कस होईल) तर अल्लाहने आम्हावर कृपा केली आणि आम्हाला होरपळून टाकणाऱ्या अग्नी व यातनांपासून वाचविले. आम्ही यापूर्वी (जगात) त्याचा धावा करीत होतो (उपासना करीत होतो) निःसंदेह तो (अल्लाह) वचनपूर्ती करणारा व दयावान आहे." (दिव्य कुरआन - ५२ : २५-२८)

अल्लाह वचन पूर्ण करणारा व दयावान आहे. म्हणून त्याचे प्रामाणिक सेवक नरकाच्या यातनेपासून दूर राहतील व स्वर्गाच्या सदैव राहणाऱ्या अपार देणग्यांचे अधिकारी बनतील.

निर्णय

पुरस्कार व शिक्षेसाठी न्यायालयाचे गठन होणे आवश्यक आहे, हिशेब व्हावा, लोकांच्या बाजूने अथवा विरोधात साक्षी दिल्या जाव्यात आणि न्यायाधीशाने न्यायपूर्णरितीने निर्णय-निकाल द्यावा. जगात जर न्याय होत नाही अथवा लोकांना त्यांच्या कर्माचे फळ पुरस्कार अथवा शिक्षेच्या रूपात मिळत नाही तर त्याची अनेक कारणे आहेत.

अपराधी पकडला जात नाही.

पकडला गेल्यास त्याच्याविरुद्ध साक्षी मिळत नाहीत.

त्याच्या अपराधाचे योग्यप्रकारे आकलन होत नाही.

न्यायाधीशाला व्यक्तिश: घटनेचे ज्ञान असत नाही आणि खोट्या साक्षी व वकिली कौशल्याच्या जोराने तो वाहत जातो.

दबाव, शिफारस, लाच अथवा आपल्या एखाद्या चुकीच्या कलामुळे न्यायाधीश न्याय करीत नाही.

न्यायालयाकडून निकाल लागतो, परंतु परिस्थिती अशी उद्भवते की निकालाची अंमलबजावणी होत नाही.

गुन्हे इतक्या अधिक संख्येने असतात की गुन्हेगाराचे जीवन शिक्षा भोगण्यासाठी अपुरे पडते आणि एखाद्या अपराधाची शिक्षा भोगून तो या जगातून मृत्यू आल्यामुळे निघून जातो.

अशाचप्रकारे जे लोक जगात काही सत्कृत्ये करतात, त्यांना त्यांच्या कर्मांचे जर फळ मिळत नसेल, तर याचीसुद्धा अनेक कारणे असू शकतात. लोक निष्कपट व देखावा न करता कार्य करणाऱ्यांच्या वास्तविक रूपाने परिचित नसतात व ढोंगी आणि धोकेबाज लोकांकडून प्रभावित होतात आणि जरी परिचित झाले तरी त्यांच्यापाशी ती साधने नसतात की, जेणेकरून त्यांना त्यांच्या कार्याबद्दल पुरेपूर पुरस्कार देणे शक्य व्हावे अथवा त्यांचे जीवन व जगातील सीमित साधन, पुरस्कार देण्यास अथवा पुरस्कार प्राप्त करण्यास योग्य असत नाहीत.

परलोकात यापैकी कोणताही अडथळा असणार नाही. प्रत्येक व्यक्ती अल्लाहच्या न्यायालयात हजर होईल आणि कोणतीही व्यक्ती त्याच्या अथवा त्याच्या देवदूतांच्या पकडीपासून वाचू शकणार नाही -

''आणि त्या दिवशी की जेव्हा आम्ही पर्वतांना हटवू आणि तुम्ही पृथ्वीला स्पष्ट मैदानाच्या रूपात पाहाल आणि आम्ही त्या सर्वांना एकत्रित करू तेव्हा त्यांच्यापैकी कोणा एकालाही सोडणार नाही आणि सर्व लोक तुमच्या पालनकर्त्यांसमोर रांगेत आणले जातील. (म्हटले जाईल) तुम्ही आमच्यापाशी येऊन पोचला ना! जसे की आम्ही तुम्हाला पहिल्यांदा निर्माण केले होते! परंतु तुम्ही तर असे समजून बसला होता की आम्ही

तुमच्यासाठी (निर्णयाची) कोणतीही वेळ ठेवणार नाही.''

(दिव्य कुरआन - १८ : ४७-४८)

देवदूत मनुष्याच्या जीवनाची पूर्ण नोंद करीत आहेत.

''आणि निश्चितपणे तुमच्यावर लक्ष ठेवणारे नेमलेले आहेत. जे प्रतिष्ठावान आहेत, (कर्मपत्र) लिहीत आहेत. तुम्ही जे काही करता ते सर्व काही जाणतात.''

(दिव्य कुरआन - ८२ : १०-१२)

हे रेकॉर्ड अल्लाहच्या न्यायालयात सादर होईल -

''आणि रेकॉर्ड (कर्मपत्र) न्यायालयात सादर होईल. तेव्हा तुम्ही अपराध्यांना पाहाल की जे काही त्यात आहे ते पाहून त्यांना थरकाप सुटेल आणि म्हणत असतील. ''अरेरे आमचे दुर्भाग्य !'' या कर्मपत्राला काय झाले आहे. लहान अथवा मोठा कोणताही असा अपराध नाही की ज्याचा यात उल्लेख नाही आणि जे कर्म त्यांनी केले होते ते त्यांना त्यात आढळतील आणि तुमचा पालनकर्ता कोणावरही अत्याचार करीत नाही.''

(दिव्य कुरआन, १८ : ४९)

''जी कर्मे त्यांनी केली होती, ती हजर असल्याचे ते पाहतील.'' हे शब्द दर्शवितात की, रेकॉर्डची स्थिती अशी असेल की लोक आपल्या डोळ्यांनी आपली कर्मे पाहत असतील, ज्यामुळे त्यांना इन्कार करण्याचे धाडस होऊ शकणार नाही. या आशयाच्या आणखी काही आयती आहेत. जसे -

''तर ज्याने कणभरसुद्धा सत्कार्य केले असेल तो ते पाहील व ज्याने कणभरसुद्धा दुष्कृत्य केले असेल तर तो ते पाहील.'' (दिव्य कुरआन - ९९ : ७-८)

मानवसाक्षीदार प्रस्तुत होतील,

''आणि प्रेषितांना व साक्षीदारांना आणले जाईल.'' (दिव्य कुरआन - ३९ : ६९)

जमीन ग्वाही देईल की मनुष्याने तिच्या पाठीवर काय काम केले,

''त्या दिवशी जमीन आपल्या वार्ता ऐकवील कारण तुमच्या प्रभूने तिला आज्ञा दिली असेल.'' (दिव्य कुरआन - ९९ : ४-५)

खुद्द मानवाचे संपूर्ण शरीर व त्याचा प्रत्येक अवयव ग्वाही देईल की त्याने आपल्या जीवनात काय केले. हे एक असले रेकॉर्ड आहे जे खुद्द माणसाच्या अस्तित्त्वात संकलित होत आहे आणि याचे महत्त्व अशासाठी फार जास्त आहे की माणसाचे अवयव जे त्याच्या आदेशावर कार्यमग्न राहिले होते तेच ग्वाही देतील की, ''आम्ही हे सर्व काही करीत राहिलो आहोत.''

''येथपावेतो की जेव्हा ते (अवज्ञाकारी) त्याच्या (नरकाच्या) जवळ पोहचतील, तेव्हा त्याचे कान डोळे आणि त्वचा त्यांच्या विरुद्ध ग्वाही देतील की, ते काय करीत राहिले होते. ते आपल्या त्वचेला विचारतील की तुम्ही आमच्याविरुद्ध का साक्ष दिली? त्या म्हणतील

की, आम्हाला अल्लाहने बोलते केले. ज्याने प्रत्येक वस्तुला बोलते केले आहे.''
(दिव्य कुरआन - ४१ : २०-२१)

आणि शेवटची गोष्ट अशी आहे की निर्णय करणारा अल्लाह असेल, ज्याला स्वतःला प्रत्येक गोष्टीचे पुरेपूर ज्ञान असेल. त्याच्या नजरेपासून कोणतीही गोष्ट लपलेली नाही आणि इन्कार करून किंवा खोटे बोलून त्याला फसविले जाऊ शकणार नाही. तो स्वतः सांगेल की, वास्तविकता काय होती,

''तर आम्ही त्या लोकांना अवश्य विचारू की, ज्यांच्याकडे प्रेषित पाठविले गेले होते आणि प्रेषितांनासुद्धा आम्ही अवश्य विचारू. मग आम्ही (आपल्या) ज्ञानाच्या आधारे सर्व अहवाल ऐकविल्याशिवाय राहणार नाही, कारण आम्ही कोठेही गडप झालो नव्हतो.''
(दिव्य कुरआन - ७ : ६-७)

''हे (ईशदूत) सांगा, मृत्यू - ज्याच्यापासून तुम्ही पलायन करता - तो तुम्हाला आल्याशिवाय राहणार नाही, मग तुम्ही त्याच्याकडे (अल्लाहकडे) परतविले जाल, जो परोक्ष व प्रत्यक्ष जाणणारा आहे. तो तुम्हाला सांगेल की तुम्ही (जगात) काय काय करीत होता.''
(दिव्य कुरआन - ६२ : ८)

''तुमच्यापैकी जो हळू हळू आवाजात बोलतो अथवा उच्च स्वरात, जो रात्रीच्या (अंधारात) लपलेला असो आणि जो दिवसा प्रवास करीत असो, त्याच्यासाठी (अल्लाहसाठी) सर्व समान आहेत.''
(दिव्य कुरआन - १३ : १०)

अल्लाह अंतर्यामी आहे, तो हृदयातील सर्व भेद जाणतो.

''आम्हीच माणसाला निर्माण केले आणि आम्हाला चांगल्या प्रकारे माहीत आहे की त्याच्या मनात कोणकोणते विचार येतात आणि आम्ही त्याच्या मानेच्या शिरेपेक्षासुद्धा त्याच्या अधिक जवळ आहोत.''
(दिव्य कुरआन - ५० : १६)

मानव जीवनाचे कोणतेही क्षेत्र आणि मानवाच्या मनात येणारा कोणताही विचार त्याच्यापासून लपलेला नाही. तो प्रत्येक वस्तू आणि कर्माचा हिशेब अवश्य होईल.

''जे काही आकाशात आहे आणि जे काही पृथ्वीत आहे, सर्व अल्लाहचेच आहे आणि जे काही तुमच्या मनात आहे, तुम्ही व्यक्त करा अथवा ते लपवा, अल्लाह त्याचा हिशेब निश्चितपणे घेईल. मग तो ज्याला इच्छील क्षमा करील आणि ज्याला इच्छील त्याला यातना देईल. अल्लाहला प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य प्राप्त आहे.'' (दिव्य कुरआन - २ : २८४)

''ज्याला इच्छील क्षमा करील आणि ज्याला इच्छील त्याला यातना देईल.''चा अर्थ असा नव्हे की तो तारतम्यरहित निर्णय देईल आणि क्षमायोग्य व्यक्तीलासुद्धा नरकात ढकलेल आणि नरकाच्या अधिकारी व्यक्तीला स्वर्गात पाठवील, नव्हे असे होणे कदापि शक्य नाही. अल्लाह तत्त्वदर्शी व ज्ञानसंपन्न आहे, तो न्यायप्रिय व न्याय करणारा आहे, तो दयावान व गुणग्राहक आहे. अशा प्रकारच्या अनौचित्य, मूर्खपणा व अत्याचारांची कल्पनासुद्धा त्याच्या संबंधाने केली जाऊ शकत नाही. जर असे करावयाचे होते तर हिशेब

घेण्याची काय गरज होती. याचे तात्पर्य असे आहे की क्षमा करणे व यातना देण्याचा निर्णय शंभर टक्के अल्लाहच्या इच्छेवर अवलंबून आहे. त्यात अन्य कोणाचा कणभरसुद्धा हस्तक्षेप नाही. हा निकाल तो स्वत: लागू करील आणि निश्चितच लागू करील. कोणातसुद्धा त्यात बोलण्याचे सामर्थ्य नसेल, सर्वशक्तिमान अल्लाहपुढे कोण बोलू शकतो?

या सर्व गोष्टीनंतरसुद्धा निर्णय होणार नाही. तर दोषी लोकांना आपली बाजू मांडण्याची व स्वत: निर्दोष असल्याचे सिद्ध करण्याची संधी दिली जाईल. तेव्हा एखादा अपराधी इन्कार करील, एखादा बहाणा वरील व एखादा सरळ सरळ आपला दोष स्वीकारील आणि पुन्हा सत्कर्म करण्यासाठी संधी मागेल जी त्याला दिली जाणार नाही -

‘‘आणि त्या दिवशी आम्ही त्या सर्वांना एकत्रित करू. मग आम्ही त्या लोकांना, ज्यांनी अनेकेश्वरत्वाचा अवलंब केला असेल, सांगू की तुम्ही ठरविलेले ईश्वर कोठे आहेत, ज्यांना तुम्ही अल्लाहचा भागीदार ठरविले होते? मग त्यांचा उपद्रव याशिवाय काही असणार नाही की आमच्या पालनकर्त्या अल्लाहची शपथ! आम्ही अनेकेश्वरवादी नव्हतो.’’

(दिव्य कुरआन - ६ : २२-२३)

‘‘आणि किती बरे चांगले झाले असते जर तुम्ही पाहिले असते की, जेव्हा अपराधी आपल्या पालनकर्त्यासमोर नतमस्तक (उभे) असतील. (सांगत असतील) हे आमच्या पालनकर्त्या! (आम्ही सर्वकाही) पाहिले आणि ऐकले. आता आम्हाला परत पाठव. आम्ही सत्कर्म करू. आता आमचा विश्वास बसला.’’ (दिव्य कुरआन - ३२ : १२)

ते आपला दोष दुसऱ्यावर घालण्यासाठी म्हणतील,

‘‘आणि ते म्हणतील की, हे आमच्या पालनकर्त्या! आम्ही आमच्या सरदारांचे व आपल्या वडिलधारी मंडळीचे म्हणणे ऐकले आणि त्यांनी आम्हाला मार्गभ्रष्ट केले.’’

(दिव्य कुरआन - ३३ : ६७)

तेथे कोणाची कोणतीही अनुचित युक्ती आणि बहाणा काही उपयोगी पडणार नाही. त्यांना स्पष्टपणे सांगितले जाईल,

‘‘हे इन्कार करणाऱ्यांनो! आज बहाणा करू नका. तुम्हाला त्याच कामांचा मोबदला दिला जात आहे, जे तुम्ही स्वत: करीत होता.’’ (दिव्य कुरआन - ६६ : ७)

परंतु यानंतरसुद्धा निर्णय पूर्णत: लागणार नाही, तर प्रत्येक व्यक्तीची श्रद्धा व कर्म तोलले जाईल आणि याच वजनानुसार लोकांना शिक्षा अथवा पुरस्कार मिळेल,

‘‘आणि आम्ही अंतिम प्रलयाच्या दिवशी न्यायाचा तराजू स्थापित करू, तेव्हा कोणत्याही व्यक्तीवर थोडासुद्धा जुलूम होणार नाही आणि जर एखाद्या व्यक्तीचे मोहरीच्या दाण्याबरोबरसुद्धा काम असेल तर आम्ही ते आणून हजर करू आणि हिशेब घेण्यासाठी आम्ही अगदी पुरेसे आहोत.’’ (दिव्य कुरआन - २१ : ४७)

अर्थात कर्मांचे वजन अशासाठी केले जाईल की लोकांशी पुरेपूर न्याय केला जावा.

वजन न्यायपूर्ण रीतीने होईल आणि योग्य तराजूने बिनचूक तोलले जाईल. असेही घडणार नाही की, एखादी गोष्ट तोलण्याची राहून जाईल. मोहरीच्या दाण्याबरोबरसुद्धा एखादी वस्तू अल्लाहच्या दृष्टीपासून लपून राहणे शक्य नाही. अल्लाह लहान-मोठी प्रत्येक वस्तू आणि प्रत्येक कामाला आणून हजर करील आणि नंतर त्यांचे अगदी बरोबर वजन करील.

पूर्वीच्या लोकांच्या लक्षात ही गोष्ट येत नसे की श्रद्धा आणि कर्म कशाप्रकारे तोलले जातील. परंतु आता की जेव्हा मनुष्य आपल्या अपूर्ण ज्ञान व सीमित साधनाने गती, तापमान व वीजच नव्हे, तर मनुष्याच्या नाड्या, मन व बुद्धीवर पडणाऱ्या प्रभावांनासुद्धा रेकॉर्ड करतो, तर ही गोष्ट समजून घेणे अजिबात कठीण नाही की अल्लाह जो सर्वशक्तिमान आहे, आपल्या असीम सामर्थ्य व विवेकाने अंतिम न्यायाच्या दिवशी लोकांच्या श्रद्धा व चरित्राचे वजन करील. ही गोष्ट वेगळी आहे की प्रत्येक वस्तू तोलण्याचा अथवा मापण्याचा तराजू वेगळा असतो आणि जी वस्तू तोलावयाची असते त्यानुसारच तराजू अथवा मापाचा प्रयोग केला जातो. श्रद्धा आणि चारित्र्याला त्याच तराजूचे तोलले जाईल, जो त्यांचे वजन करण्यासाठी अनुकूल असेल.

अशाप्रकारे वजन केल्यामुळे ज्या लोकांचे जीवन-कर्म वजनाने भारी (जड) ठरेल ते अल्लाहच्या प्रसन्नतेच व स्वर्गाचे अधिकारी होतील. त्यांना चिरस्थायी यश मिळेल. या उलट ज्या लोकांचे जीवनकर्म वजनरहित असेल, ते अयशस्वी आणि नरकाच्या घोर यातनांचे भागीदार होतील.

''आणि त्या दिवशी बरोबर तोलले जाईल, मग ज्यांचे वजन (कर्म) भारी (जड) असतील, तेच यश प्राप्त करणारे असतील आणि ज्यांचे वजन (कर्म) हलके असतील, तर हेच ते लोक असतील ज्यांनी स्वत:ला नुकसानीत घातले आहे. कारण ते आमच्या 'आयतीं' (चा इन्कार करून त्या) वर जुलूम करीत असत.'' (दिव्य कुरआन - ७ : ८-९)

एका अन्य ठिकाणी या सत्याचा उल्लेख असा झाला आहे,

''तर ज्यांचे पारडे जड असतील ते आपल्या पसंतीचे जीवन व्यतीत करतील आणि ज्यांचे पारडे हलके असतील त्यांची जागा खोल खड्डा (नरक) असेल आणि तुम्हाला काय कल्पना की तो खड्डा आहे कशाचा? अग्नी आहे धगधगता.''

(दिव्य कुरआन-१०१ : ६-११)

कोणत्या लोकांचे जीवनकर्म भारी असेल आणि कोणाचा हलका? पवित्र कुरआनमध्ये याचे विस्तृत विवेचन या शब्दांत झाले आहे,

''(हे ईशदूत !) सांगा की, काय आम्ही तुम्हाला सांगावे की, ते कोण लोक आहेत, जे कर्माच्या (फळाच्या) दृष्टीने अत्यंत असफल आणि सर्वांत जास्त नुकसान सहन करणारे आहेत. हे ते लोक आहेत, ज्यांचे कार्यकलाप ऐहिक जीवनात विरुद्ध गेले (आणि ते अल्लाह आणि परलोकासाठी काही करू शकले नाहीत) आणि त्यांना असे वाटत राहिले की, ते सत्कार्य करीत आहेत. हे ते लोक आहेत ज्यांनी आपल्या पालनकर्त्याच्या आयतींचा

आणि त्याच्या समोर उपस्थित होण्याचा इन्कार केला, तेव्हा त्यांनी केले-सवरलेले व्यर्थ गेले आणि कयामतच्या दिवशी आम्ही त्यांचे काहीही वजन निश्चित करणार नाही. अशा लोकांची शिक्षा नरक आहे कारण त्यांनी इन्कार केला आणि माझ्या प्रेषितांची टिंगल उडविली. नि:संदेह, ज्या लोकांनी श्रद्धा बाळगली आणि सत्कार्य केले त्यांच्या स्वागतासाठी स्वर्गातील उद्याने असतील, ज्यात ते सदैव राहतील आणि तेथून कधीही निघू इच्छिणार नाहीत.'' (दिव्य कुरआन - १८ : १०३-१०८)

तात्पर्य असे की जीवनकर्मात वजन, श्रद्धा व सत्कर्म अल्लाहची प्रसन्नता व परलोकाच्या इच्छेतून निर्माण होते. इन्कार, अनेकेश्वरवाद आणि ऐहिक सुखलोलुपता यामुळे सत्कर्मसुद्धा अगदी हलके बनतात. कारण संपूर्ण विश्व व मानवाचा सृष्टा, स्वामी, पालनकर्ता, उपकारी व शासक अल्लाहशी विद्रोह केल्यानंतर सुकर्माचे महत्त्व नाहिसे होते आणि केवळ ऐहिकता कोणत्याही सत्कार्याला सत्कार्य राहू देत नाही. कोणत्याही परिस्थितीत अल्लाहशी विद्रोह करणे व ऐहिक गोष्टीत निमग्न राहणे सर्वांत मोठी वाईट गोष्ट व सर्व प्रकारच्या वाईट गोष्टींचे स्रोत आहे.

पूर्ण मोबदल्याची बौद्धिक कल्पना

गत पृष्ठांत ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे, हे जग शुभ-अशुभ मोबदल्यासाठी अनुकूल नाही. इतकेच नव्हे की येथे पुण्याचे चांगले फळ व पापाची शिक्षा मिळत नाही आणि ती मिळूही शकत नाही. येथे जी शिक्षा अथवा पुरस्कार मिळेल तो अवश्य अपूर्ण असेल, कारण मानवजीवन अत्यंत तोकडे आहे आणि ते मानवकर्मांची शिक्षा अथवा पुरस्कार पूर्ण होण्यापूर्वीच समाप्त होते.

पृथ्वीची संसाधने, ज्यावर मनुष्याला अधिकार प्राप्त आहे, शिक्षा व पुरस्कारांसाठी जितकी आवश्यक आहेत, त्याच्या तुलनेत सीमित आहेत, ज्या देणग्या येथे मिळतात, त्यांच्याबरोबर जबाबदारी व उत्तरदायित्वाच्या मोठ्या अनुभूति जुडलेल्या असतात. देणग्या हिरावून घेतल्या जाण्याचे भय आणि त्या नष्ट झाल्यावर त्या जाण्याचे दु:ख, हे दोन रोग मानवाची सुख-शांती नष्ट करणारे सिद्ध होतात. याशिवाय या जगात कोणाच्याही हिश्यात केवळ सुखच येते असे नाही, तर सुख व आरामाबरोबर निश्चितपणे कोणते न कोणते दु:ख अवश्य असते. मग आणखी एक गोष्ट आहे की, मनुष्य शरीर, मस्तिष्क आणि आत्मा या तिन्हींचा संयोग आहे आणि त्याला त्याच वेळी शांती मिळू शकते जेव्हा शरीर, मस्तिष्क आणि आत्मा या तिन्हींच्या गरजा पूर्ण होतील, परंतु येथे असे घडत नाही. शारीरिक गरजांची पूर्ती होते तर आत्मिक शांती दुर्लक्ष असते, आत्म्याची शांती मिळते तर शारीरिक सुख-शांतीची पूर्तता होत नाही. या दोन्ही गरजा काही अंशी पुऱ्या होतात, तर छंद, आवड, ज्ञान व बुद्धीच्या पैलूने अतृप्ति असते. इतकेच नव्हे तर येथे कोणत्याही पैलूनेसुद्धा देणग्यांची परिपूर्ती होत नाही. येथे माणसाला अधिक दृष्टीने ते सर्व काही मिळत नाही, जो ते इच्छितो. आत्म्याची सुख-शांती जर त्याला मिळते, तर ती पूर्णपणे मिळत नाही आणि ज्ञान

व चिंतनाच्या शिखरावर पोचल्यानंतरसुद्धा तो स्वत: विश्व व त्याच्या वास्तविकतेसंबंधी अंधारात घेरला गेल्याचा अनुभव करतो. मनुष्य आपल्या संतोषासाठी एका अशा लोकाची (जगाची) इच्छा करतो, जेथे त्याच्या सर्व आर्थिक इच्छा व आवश्यकता पूर्ण होतील, जेथे त्याचे सर्व छंद पूर्ण व्हावेत आणि जेथे वास्तविकता पूर्णपणे उघड होऊन त्याच्यासमोर याव्यात. दुसऱ्या शब्दांत परिपूर्ण मोबदल्यासाठी आवश्यक आहे की,

* मनुष्याचे जीवन नश्वर असू नये.

* ब्रह्मांडाची साधने अमर्याद व ब्रह्मांड शाश्वत असावे.

* भय, चिंता, त्रास, आजार, म्हातारपण आणि सर्व प्रकारच्या दु:खापासून जीवन सुरक्षित असावे.

* सर्व शारीरिक इच्छा पूर्ण व्हाव्यात व भौतिक सुख-सुविधांची सर्व सामुग्री उपलब्ध व्हावी.

* ब्रह्मांडाच्या वास्तविकता मनुष्याला पूर्णपणे स्पष्ट व्हाव्यात.

* आत्मसंतोषाची सर्व साधने विद्यमान असावीत.

* मनुष्याच्या सर्व आवडी पुऱ्या व्हाव्यात.

* आणि या सर्व देणग्यांबरोबर त्याला कोणत्याही देणगीसंबंधी जाब द्यावा लगू नये.

केवळ असलाच मोबदला, पूर्ण मोबदला म्हटला जाऊ शकतो आणि हे प्राप्त केल्यानंतरच मानव स्वभावाला शांती मिळू शकते. याच्यापेक्षा निम्नकोटीचा प्रत्येक मोबदला अपूर्ण असेल आणि तो मनुष्याला संतोष व शांती प्रदान करू शकणार नाही. याच पूर्ण, वास्तविक व स्वाभाविक मोबदल्याचे नाव स्वर्ग आहे, जी परलोकात त्या लोकांना प्राप्त होईल, जे अल्लाहप्रति प्रामाणिकता व दासत्वाची दृढ प्रतिज्ञा करून जीवनात त्याच्याप्रति कर्तव्यनिष्ठ राहतील.

–०समाप्त०–